नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ नागपूर

(घटना कलम १२ (अं) नुसार)

सर्व सभासदांसाठी निवडणूकविषयक अधिसूचना

विदर्भ साहित्य संघाच्या सर्व सभासदांना सूचित करण्यात येत आहे की, दिनांक १–४–१९८९ ते ३१–३–१९९२ ह्या तीन वर्षाकरिता विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष व कार्यकारी मंडळाचे १९ सभासद यांच्या निवडणुकीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील.

१. वरील पदांकरिता पाठवावयाच्या नामनिर्देशन पत्रिका निर्वाचनाधिकाऱ्यांच्या नावे केंद्रीय कार्यालयात मंगळवार दिनांक १७–१–१९८९ सायंकाळी ८ वाजेपर्यंत पोचावयास हव्या. मतदारांच्या सूचीतील कोणत्याही व्यक्तीस सभासदाच्या सुचीमधील (दुरुस्त्यांसहित) कोणत्याही व्यक्तीचे नांव तिच्या लेखी अनुमतीसह सुचविता येईल. नामनिर्देशनपत्र जर पोस्टाने पोचते करणे असेल तर ते 'रजि. पोस्ट ॲकनॉलेजमेंट ड्यू' पद्धतीने पोचते केले पाहिजे. अशा तऱ्हेने पोचते झालेले नामनिर्देशनपत्र जर नेमलेल्या अंतिम तारीख व वेळेपर्यंत निर्वाचनाधिकाऱ्यास मिळाले असेल तरच ते छाननीत घेतले जाईल.

२. बुधवार दिनांक १८–१–१९८९ सायंकाळी ७ वाजतापासून केंद्रीय कार्यालयात उमेदवारांच्या नामनिर्देशन–पत्रिकांची छाननी करण्यात येईल. ह्यावेळी उमेदवारांना स्वत: किंवा त्यांनी लेखी नेमलेल्या प्रतिनिधींना उपस्थित राहता येईल.

३. छाननीअंती स्वीकृत झालेल्या उमेदवारांची यादी केंद्रीय कार्यालयाच्या सूचना फलकावर बुधवार दिनांक १८–१–१९८९ ला लावण्यात येईल.

४. नामनिर्देशन–पत्रिकांच्या स्वीकृती किंवा अस्वीकृतीबाबत लवादाकडे तक्रार–अर्ज करण्याची अंतिम तारीख सोमवार दिनांक २३–१–१९८९ सायंकाळी ७ वाजेपर्यंत ही राहील.

५. लवादासमोरील पहिल्या सुनावणीकरिता शनिवार दिनांक २८–१–१९८९ सायंकाळी ७ ही तारीख व वेळ निश्चित करण्यात आली आहे.

६. तक्रारीच्या अंतिम निकालाची तारीख शनिवार दिनांक ४–२–१९८९ सायंकाळी ७ वाजता राहील.

७. नामनिर्देशन–पत्रिका परत घेण्याची अंतिम तारीख गुरुवार दिनांक ९–२–१९८९ सायंकाळी ७–३० वाजेपर्यंत राहील.

(मलपृष्ठ ३ वर)

अनुक्रमणिका

जुलै–ऑगस्ट–सप्टेंबर / ऑक्टो–नोव्हें–डिसेंबर
एकोणवीसशे अठ्यांशी
वर्ष ४४ : अंक ७ ते १२
[महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अंशतः अनुदान प्राप्त]

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

मुख्य संपादक : आशा सावदेकर
संपादक : श्रीपाद भालचंद्र जोशी
कार्यकारी संपादक : केशव जोशी

अनुक्रम . . .

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.

■ संपर्क : संपादक युगवाणी, वि. सा. संघ, झाशी राणी चौक, नागपूर १२ / दूरभाष : २३९२९

अनुक्रमणिका

संपादकीय

'युगवाणी'चा हा अंक संशोधन आणि समीक्षेवर भर देणारा आहे. आकाराने हा अंक फारसा मोठा नसला तरी वाङ्मयेतिहास, साहित्य या क्षेत्रातील अनेकविध समस्यांना स्पर्श करणारा आहे.

कविवर्य कुसुमाग्रज उर्फ वि. वा. शिरवाडकर यांचे ज्ञानपीठासारखा सर्वोच्च पुरस्कार मिळाल्याबद्दल आम्ही अभिनंदन करतो. कथाकार शांताराम उर्फ के. ज. पुरोहित यांचेही ६२ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद प्राप्त झाल्याबद्दल 'युगवाणी' अभिनंदन करीत आहे.

काही अपरिहार्य व आकस्मिक कारणांमुळे 'युगवाणी'चा हा अंक जुलै–ऑगस्ट–सप्टेंबर आणि आक्टो.–नोव्हें.–डिसें. असा जोड अंक काढावा लागत आहे. आमच्या वाचकांनी याची कृपया नोंद घ्यावी. पुढील अंक हा विशेषांक रूपात; भरघोस साहित्य घेऊन आपल्या भेटीला येईल.

६२ वे साहित्यसंमेलन विदर्भात अमरावती येथे होत आहे. या साहित्य संमेलनातून महत्त्वपूर्ण साहित्यिक चळवळी, घडामोडी आणि नवनवे प्रवाह यांचे पुनर्मूल्यन होईल, नवीन विचारांचे उद्घाटन होईल आणि चांगल्या परंपरांचे स्मरण होईल. अशी अपेक्षा आहे. साहित्य संमेलन हे व्यक्तींना महत्त्व देणारे नसावे; साहित्याला महत्त्व देणारे असावे. साहित्य रसिकांची ही यात्रा साहित्याच्या नव्या विचाराकडे नेणारी ठरो ही शुभेच्छा !

सध्या नागपुरात वास्तव्य असणारे विश्वविख्यात चित्रकार श्री. अरुण दाभोळकर यांनी या अंकासाठी सुंदर मुखपृष्ठ तयार करून दिले त्याबद्दल त्यांचे विदर्भ साहित्य संघातर्फे हार्दिक आभार !

आशा सावदेकर

अनुक्रमणिका

मानाचे पान

साहित्याग्रणी कवी कुसुमाग्रज उर्फ वि. वा. शिरवाडकर यांना आम्ही याच वर्षारंभी अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त मानाचे पान अर्पण केले होते. आज त्यांनी ज्ञानपीठ पारितोषिक विजेते ठरुन मराठी माणसाच्या रसिकतेला आणि मराठी साहित्याला जो बहुमान प्राप्त करून दिला आहे त्यानिमित्त वर्ष अखेरच्या या 'युगवाणी'चे मानाचे पान आम्ही पुन्हा कविवर्य कुसुमाग्रजांना कवी बा. भ. बोरकर यांच्याच शब्दात अर्पण करीत आहोत.

कुसुमाग्रजास । बा. भ. बोरकर / २६–९–१९४२

घन तमी प्रगटली तुझी जेधवा कविता
अवतरली गमले अग्नीची सुरसरिता
कल्लोळत आली नागिण जणु दुखलेली
ॐकाररूपिणी अवमानित मानवता
या भागिरथीचा ओघ दिव्य शब्दांचा
यज्ञदग्ध उज्ज्वल अश्रूंचा–रक्ताचा
संजीवक प्राणच ये तव वितळुनि किंवा
उद्धार कराया दलित सगरपुत्रांचा
शारदाच वा ही कोपुनि झाली काली
व्यथितांची ऐकुनि घोर करुण किंकाळी
साम्राज्य बळींचे स्थापाया जगतात
हाणीत खड्ग ये बलोद्धतांच्या भाळी
ही तुडवित येई क्षुद्र भोग–शृंगारा
नवविश्व सृजाया करित निघे संहारा
स्त्रकरेच निखारा ठेवुनि स्वार्थावरती
ही अतिरति झाली मदनारीची दारा
चालु दे हिचे रणतांडव विक्रमशाली
उठु देत स्मशानामधून कोटि मशाली
प्रळयात जळुनि या नरकासुर अंधार
होऊ दे पहाटे आधि दिशात दिवाळी

आशा सावदेकर

अनुक्रमणिका

ज्ञानदेवांचा समन्वयवाद

य. म. पठाण

यादवकालीन परिस्थितीचा मूलगामी स्वरूपाचा विचार ज्ञानदेवांनी केला असावा, असे त्यांच्या लेखनावरून लक्षात येते. त्यांच्या या चिन्तनाविषयी तर्क करण्यासाठी आज जी साधनं उपलब्ध होतात, ती दोन प्रकारची आहेत : (१) समकालीन साधने आणि (२) उत्तरकालीन साधने. उत्तरकालीन साधने समकालीन साधनांइतकी विश्वासार्ह वा प्रमाण मानता येणार नाहीत. शिवाय उत्तरकालीन साधनांत मध्ययुगीन मराठी सन्तचरित्रातील एका अविभाज्य घटकाचा समावेश होतो आणि तो म्हणजे त्यांतील आख्यायिकांनी निर्मिलेले या संत-चरित्राभोवतीचे अद्भुततेचे वलय. हे वलय नसते तर आज ही संतचरित्रे किती वास्तव, जिवंत व प्रत्ययकारी वाटली असती. या वलयाच्या जन्मखुणा संतविषयक श्रद्धेत आढळतात. पण निकोप श्रद्धेतून त्यांचे कधी कधी अन्धश्रद्धेत रूपांतर झाल्यामुळे संताचे तेजःपुंज व्यक्तिमत्त्व व विभूतिमत्व त्यात झाकळून जाते. वास्तवाने अद्भुततेच्या क्षितिजात प्रवेश केला की संतचरित्र भू-गोलात न राहता खगोलात प्रविष्ट होते.

या ज्ञानदेवविषयक उत्तरकालीन साधनात काही साधने मात्र लक्षांत घेण्याजोगी असून त्यात आपल्याला एकनाथांच्या नि काही अन्य वारकरी संतांच्या लेखनाचा समावेश करावा लागेल. एकनाथांनी जसे ज्ञानदेवाच्या ज्ञानेश्वरीचे संशोधन केले तसेच त्यांच्या संपूर्ण विचारप्रणालीचेही पुन्हा मनन-चिंतन केले, याचा याचा प्रत्यय एकनाथी भागवत वाचताना पदोपदी येतो. ज्ञानेश्वरी नि नाथ-भागवत यांत जे वैचारिक अद्वैत आढळते त्यांचे कारणही नाथांची ज्ञानदेवांशी असलेली वैचारिक सलगी, जवळीक व एकरूपता हेच होय. नाथभागवतात ज्ञानदेवांच्या विचारप्रणालीची अंतःसूत्रे गवसतात. त्यांच्या भागवतात जशी ही सूत्रे गवसतात, त्याचप्रमाणे त्यांच्या अभंग-साहित्यातही ती आढळतात. नाथोत्तर अभंगवाङ्मयात अर्थातच या विचारप्रणालीच्या पाऊलखुणा उमटल्या आहेत. तुकोबा नि निळोबा या संतश्रेष्ठांच्या अभंग-साहित्याचा या संदर्भात विशेष उल्लेख करायला हवा. ज्ञादेवाच्या विचारप्रणालीचे उत्तरकालीन सन्तसाहित्यात उमटलेले साद-पडसाद हा खरे तर स्वतंत्र संशोधनाचा व अध्ययनाचा विषय आहे. त्या दृष्टीने पुढे कधी तरी या पाऊलखुणा शोधण्याचा प्रयत्न करायचं माझ्या मनात फार आहे. त्यातून ज्ञानदेवांनी स्वकाळानंतरच्या काळालाही कसे प्रभावित केले, त्याला कसे रूप नि आकार दिला. याचे चित्रही स्पष्ट होईल.

ज्ञानदेवविषयक समकालीन साधनांची विभागणीही दोन विभागात करता येते : (१) ज्ञानदेवांचे स्वतःचे लेखन आणि (२) नामदेवादी संतांनी केलेले ज्ञानदेवाविषयक लेखन. त्यातल्या त्यात, या दुसऱ्या विभागातील लेखनात, नामदेवांचे लेखन अधिक प्रमाण मानता येईल कारण ज्ञानदेव-नामदेवांना एकमेकांचा सहवास लाभला होता व ज्ञानदेवांच्या व्यक्तिमत्वांशी व विचारविश्वाशी नामदेव परिचित होते.

या समकालीन साधनांवरून एक गोष्ट तीव्रतेने जाणवते ती ही की, ज्ञानदेव जे वास्तव जगले होते; त्या वास्तवाच्या विविधांगांचे, अनेकविध कडांचे त्यांनी समरसून दर्शन घेतले होते. त्यांच्या संतत्वाची गंगा लोकजीवनातून वाट काढत काढत पुढे जात होती. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विभूति-मत्वात रूपांतर करीत होती. केवळ स्वतःचे आत्मचिंतन हेच ज्ञानदेवांचे उद्दिष्ट असते तर हे उद्दिष्ट साध्य झाल्यावर त्यांनी समाधी घेतली असती. पण आत्मचिंतन नि त्याची फलश्रुती ही स्वतःपुरतीच वा व्यक्तिजीवनापुरतीच मर्यादित नसून तिची व्याप्ती लोकजीवनासही गवसणी घालणारी असते, स्वतःबरोबरच आपल्यासमवेत लौकिक जीवन जगणाऱ्या समाजातील अन्य घटकांनाही आत्मचिंतन करता यावे आणि त्याची फलश्रुती प्राप्त करता यावी कारण त्यात इह आणि पर यांची सार्थकता आहे, अशी ज्ञानदेवांची धारणा होती. आणि यासाठीच त्यांना जनहिताचा कळवळा वाटतो. स्वोद्धार नि लोकोद्धार यांचा समन्वय. ज्ञानदेवांनी साधला तो यासाठीच. ते त्यांच्या सम्यक विचारसरणीचे मूलभूत सूत्र आहे. खर तर स्व आणि पर यांत ज्ञानदेव द्वैत मानतच नव्हते. अद्वैतमताचा त्यांना लागलेला ध्यास हा, आपण आणि समाजातील अन्य घटक, आपण आणि परमात्मा यातील अभेद-भावनेचा सूचक असे मला सतत वाटते. जीव आणि शिव यातील एकरूपतेच्या विचाराचा आश्रय ज्ञानदेव यासाठीच घेत असावेत. शंकराचार्यांच्या केवलाद्वैतमताचे आकर्षणही त्यांना यासाठीच वाटले असावे, कारण या मतात जिवा-शिवातील भेद पूर्णतया नष्ट होऊन जीवाचे परमोच्च साध्य-परमस्वरूपच होऊ जाणे-हे साधले जाते. जीव आणि शिव यांचा समन्वय हा ज्ञानदेवांच्या संपूर्ण विचारप्रणालीचा केंद्रबिंदू आहे त्यापासून व त्याभोवती निर्माण झालेली वलये किंवा तरंग म्हणजे ज्ञानदेवांच्या या विचारप्रणालीतील परस्परसंबद्ध विचार होत. ही संपूर्ण वीण मोठी आश्चर्यजनक आहे. ती लौकिकाला पारलौकिकाशी जोडते नि पारलौकिकाला लौकिकाशी जोडते. अशाश्वताचे शाश्वताशी नाते जोडण्याचा ज्ञानदेवांचा हा लौकिक विचार मोठा अलौकिक, जगावेगळाच म्हणायचा!

जिवा-शिवाचा समन्वय जसा ज्ञानदेव साधतात, तसाच जिवा-जिवांचा, चराचराचा समन्वयही ते साधतात. ज्ञानदेव जे वास्तव जगले होते, त्यात भेदाभेद होते, चातुर्वर्ण्यमूलक विषमता होती; जातीपाती होत्या. शैववैष्णववादी मतमतांतरे होती. यादवपूर्वकालीन धर्मव्यवस्थेचे दुष्परिणाम यादव-कालीन समाज भोगत होता. जीव आणि शिव हे जर एक आहेत तर मग त्यांच्यात भेदाची ही दरी कशाला, हे ज्ञानदेवांना तीव्रतेने जाणवत असले पाहिजे आणि म्हणूनच त्यांनी चिद्विलासवादाचा स्वीकार केला असला पाहिजे. जग म्हणजे परमेश्वराच्या चित्ताचा विलास होय, असे सांगून ज्ञानदेवांनी चराचरात, जिवाजिवात, समाजातील विविध स्तरात नि घटकात एकतेचे नाते प्रस्था-पित केले, यातही त्यांची समन्वयवादी भूमिका प्रत्ययाला येते. ज्ञानदेवांनी चातुर्वर्ण्यव्यवस्था अमान्य केली काय, या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी देता येणार नाही, हे खरे, पण सामाजिक संदर्भातील चातुर्वर्ण्याची चौकट ज्ञानदेव आध्यात्मिक संदर्भात मान्य करीत नाही, हेही लक्षात घ्यायला हवं. ही चौकट पोलादी होती. तिची पकड मोठी घट्ट होती. यादवपूर्वकालीन शतकात ती अधिकाधिक घट्ट होत गेली होती. पण तिलाही तडे पाडण्याचे प्रयत्न बौद्ध, जैन व वीरशैव मतांनी केले होते. स्वकालीन वास्तवाचे भान जसे ज्ञानदेवांच्या मनात जागते होते तसेच पूर्वकालीन वास्तवाचेही होते. या पूर्वकालीन वास्तवाचे जे हिणकस स्रोत स्वकालीन वास्तवाप्रत येऊन पोचले आहेत, त्यामुळे स्वकालीन समाज तर नष्टभ्रष्ट होत चाललाच, पण त्याचे परिणाम भविष्यकालीन समाजालाही भोगावे लागणार, याची पूर्वसूचना ज्ञानदेवांचे मन त्यांना सतत देत असले पाहिजे. परंपरेचे पालन आणि तिच्यातल्या 'हीणा'चा त्याग यांच्या सीमारेषेवर ज्ञानदेव उभे आहेत. असे काहीसे या अवस्थेचे धूसर चित्र आपल्या मनासमोर उभे राहते. परंपरा-स्वीकार आणि परंपरा-त्याग या दोन्ही परस्परविरुद्ध टोकांचा समन्वय साधण्याचाही ते प्रयत्न करताहेत आणि यासाठीच त्यांनी एक मध्यममार्ग काढला आहे. समाज दुभंगण्याची प्रक्रिया थांबवण्यासाठी त्यांनी सामाजिक संदर्भातील

वर्णव्यवस्था स्वीकारली असली तरी आध्यात्मिक संदर्भात ती नाकारली आहे याच काळातील महानुभाव सम्प्रदायाचे प्रवर्तक श्रीचक्रधरस्वामी मात्र ती पूर्णतया नाकारतात. म. बसवेश्वरांनीही ती यापूर्वीच्या काळात पूर्णतया नाकारली होती. बौद्धांनी व जैनांनीही तिला विरोध केला होता. ज्ञानदेवांच्या एतद्विषयक विचारांना पूर्वसूरींच्या नकारात्मक व समतावादी विचारांची जी पार्श्वभूमी व अन्तःसूत्र लाभले, ते असे असावे असे मला वाटते. परंपरा-स्वीकार व परंपरा-त्याग या दोहोंचा समन्वय ज्ञानदेव मोठ्या कौशल्याने साधतात तो असा.

समन्वयासाठी असा परंपरा–त्याग ज्ञानदेवांनी अन्य काही बाबतीतही केला आहे. 'मार्गाधारे वर्तावे' असे म्हणत असतानाच या मार्गात काही खाचखळगे असले तर ते टाळावेत, असेही त्यांना वाटते. यजुर्वेदकाळात प्रचलित झालेल्या हिंसेने बौद्ध व जैन धर्मांच्या उदयाची बीजे पेरली, हे ज्ञानदेवांनाही अर्थातच ज्ञात होते. यज्ञाचे हे रूप व हे फलित ज्ञानदेवांनाही मान्य नव्हते. यासाठीच ते आपल्या ग्रंथांत–विशेषतः 'ज्ञानेश्वरी'त–अहिंसेविषयी प्रदीर्घ विवेचन करतात. एवढेच नव्हे तर काया, वाचा आणि मन या त्रयींच्या साहाय्याने अहिंसा तत्त्वाचे पालन कसे करावे, याविषयीही ते प्रदीर्घ विवेचन करतात. ज्ञानी पुरुष अहिंसेचे पालन कसे करतो, याचे ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायात केलेले विवेचन या दृष्टीने फार फार लक्षात घेण्याजोगे आहे, असे मला वाटते. अज्ञानी माणूस यज्ञाचा देखावा कसा करतो, याचेही ते वर्णन करतात. 'मार्गाधारे' वर्तण्याचा विचार मांडता मांडताच, त्या मार्गात काही काटेकुटे आले असले, खाचखळगे निर्माण झाले असले तर ते कसे काढून टाकावेत किंवा टाळावेत, याचाही विचार ते मांडतात. यातही त्यांची समन्वयवादी भूमिकाच मला जाणवते.

चिद्विलासवादाचा व केवलाद्वैत मताचा स्वीकार केल्याने, आध्यात्मिक संदर्भात का होईना, भक्तीच्या क्षेत्रात जातीपातीला वाव नसतो, हा समतावादी व समन्वयवादी विचार स्वीकारल्याने, यादवकालीन समाजाचे दुभंगलेपण काही अंशी ज्ञानदेवांना साधता आले. याचा वारकरी सम्प्रदायाच्या भावी वाटचालीवर दूरगामी परिणाम झाला. ज्ञानदेवकालीन सर्वस्तरीय संतांचा मेळावा व भविष्यकाळात या ध्वजाखाली जमलेले संतमंडळ यांची ग्वाही देईल. ज्ञानदेवांच्या समन्वयवादी भूमिकेतच त्यांचे द्रष्टेपण दडले होते. या अर्थानेही त्यांनी महाराष्ट्रात आध्यात्मिक समतेच्या अधिष्ठानावर नवसमाजरचनेचा पाया रचला.

ज्ञान, कर्म व भक्ती या मार्गत्रयीबद्दलही ज्ञानदेवांनी असाच समन्वयाधिष्ठित पुनर्विचार केला. या मार्गत्रयीचे त्यांनी एका अर्थाने पुनर्व्यवस्थापन (री-सिस्टेमटाइझेशन) केले. या तिन्ही मार्गांचा गाभा स्वीकारून त्यात आलेले 'हीण' ज्ञानदेवांनी काढून टाकले. त्यांनी ज्ञानाचा स्वीकार केला असला तरी त्यातले अनावश्यक तार्किकत्व, पोथीपांडित्य नि 'बाबा वाक्यं प्रमाणम्' वृत्ती काढून टाकली. कर्मातील आचारशुचिता स्वीकारली पण अनावश्यक कर्मकांडाचा मात्र त्याग केला, एवढेच नव्हे तर त्यावर परखड टीकादेखील केली. (तोरणाचे देखणेपण हे कसे बेगडी असते, ते फोडले तर आत मात्र शेणाचा गोळा निघतो, अशा आशयाच्या अनेक प्रतिमातून त्यांनी बाह्य कर्मकांडाच्या सोंगाढोंगांचे पितळ उघडे केले असून चांगल्या आचाराच्या पावित्र्याची मात्र भलावण केली आहे) भक्तीचा स्थायीभाव दृढ, अनन्य, श्रद्धा हा त्यांनी स्वीकाराला खरा, पण आंधळ्या भक्तीचा कधीच पुरस्कार केला नाही. ते सतत डोळस (ज्ञानाधिष्ठित) भक्तीचाच पुरस्कार करीत राहिले. ते सगुणामागे निर्गुण पाहतात किंवा सगुण-निर्गुण हे एकच होत असे म्हणतात, यातील रहस्यही हेच असावे. यादवकाळात ज्ञान, कर्म व भक्ती हे तिन्ही मार्ग स्वतंत्रपणे, एककल्लीपणाने, चालले होते. त्यांच्या अनुयायांनी त्यांना एकारले होते. या तिन्ही मार्गातले सारभूत तत्त्वज्ञानदेवांनी स्वीकारले, त्यांच्यामध्ये उचित समन्वय साधला नि त्यातून वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान नि आधारधर्म साकार झाला.

ज्ञानदेवांनी आणखी एक महत्त्वाचा समन्वय साधला तो हरिहरातील अभेदाचा. यादवपूर्व व यादवकालीन शैव–वैष्णव–वादामुळे समाजाचा बुद्धिभेद होत होता, तो ज्ञानदेवांनाही असह्य वाटला असावा. या दोन्ही पंथांच्या अनुयायांनी या काळात जो गदारोळ माजवला, त्यामुळे धर्मविचाराची वाट धूसर, अंधुक होऊ लागली, जनसामान्य त्यामुळे मतिमूढ झाले. यावेळी शिव आणि विष्णू हे एकच होत, असा समन्वयवादी विचार मांडणे, हे एका अर्थाने मोठे धाष्टर्याचे होते पण ज्ञानदेवांनी ते साहस समन्वयवादाच्या व समाजहिताच्या कळवळ्यापोटीच केले. त्यांनी हे साहस केले म्हणून यादवोत्तर कालात शैव–वैष्णवांचे वाद विकोपाला जाण्याऐवजी जवळ जवळ नष्ट झाले.

यातून ज्ञानदेवांनी आणखी एक समन्वय साधला तो दोन पंथांच्या मीलनाचा. शिवोपासक नाथसंप्रदाय आणि विष्णु–उपासक वारकरी संप्रदाय यांच्या मीलनाचा. ज्ञानदेव गुरूपरंपरेने नाथ-सम्प्रदायाचे व घराण्याच्या परंपरेने वारकरी सम्प्रदायाचे. पण त्यांनी समन्वयवादी विचार मांडला तो मात्र हरिहरैक्याचा. ज्ञानदेवानंतरच्या काळातही नाथसम्प्रदाय आपल्या वेगवेगळ्या शाखोपशाखांनी प्रवाहित झाला खरा, पण यादवकाळातल्या या संगमाच्या खुणा दोन्ही संप्रदायांच्या मनात रुजून राहिल्या. एकनाथ आणि तुकोबा कानफाट्यांवर टीका करतात खरी पण 'जीव' आणि 'शिव' यांच्या ऐक्याचे प्रतिपादनही करतात. इथे परमात्म्यासाठी 'शिव' या संज्ञेची योजना करताना तो 'अ–शिव', स्पर्श करण्याजोगा नाही, असे त्यांना वाटत नाही. या मागेदेखील ज्ञानदेवांनी प्रतिपादिलेली हरिहरैक्याची भूमिका कुठे तरी दडली असावी, असे जाणवते.

वर्गवाद, वर्णवाद, उच्चनीचत्व, पंथांचे व साधनामार्गांचे एकारलेपण, समाजातील दुभंगलेपण व त्याचा होणारा बुद्धिभेद, विषमता, पुरोहितत्वाचा स्वार्थमूलक बडिवार ही यादवकालीन समाजाची जीवघेणी दुःखे होती, दुखणी होती, व्यथा होत्या, वेदना होत्या, ज्ञानदेवांनी त्या सर्वांसाठीच समन्वयवादाची अचूक उपाययोजना केली. तिचे परिणाम ज्ञानदेवांनी स्वकालात अनुभवलेच पण तिची कितीतरी स्पंदने चौदाव्या शतकानंतरच्या महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात उमटत गेली. महाराष्ट्राचे धर्मजीवन ज्ञानदेवांचे ऋण कधीतरी विसरेल काय ? ■

९, आनंदनगर सोसायटी, घाटी,
औरंगाबाद–४३००११

अनुक्रमणिका

पुरंदरदासांसंबंधी : ऐतिहासिक आणि अनैतिहासिक

पंडित आवळीकर / विजया तेलंग

कन्नडमधील दास साहित्याच्या श्रेष्ठ निर्मात्यात पुरंदरदास हे अग्रपूजेचा मान मिळवणारे कवी आहेत. पुरंदरदासांच्या मधुर पदांची मोहिनी इतक्या शतकानंतरही उतरलेली नाही. त्यामुळे पुरंदरदासांसंबंधी त्यांच्या समकालीनाप्रमाणेच उत्तरकालीनांतही त्यांच्या चरित्राविषयी एक वाढते कुतूहल नेहमीच राहिले. आणि या कुतूहलातून त्यांच्या विषयी अनेक कथा–दंतकथा प्रसृत झाल्या.

या कथांतील ऐतिहासिक कोणते आणि अनैतिहासिक कोणते याचा विवेक सामान्यजनाप्रमाणेच त्यांचे चरित्रकार आणि अभ्यासक यांनाही फारसा राहिला नाही. आणि त्यामुळे पुरंदरदासांचे चरित्र तसे अज्ञातच राहिले आहे.

पुरंदरदासविषयक अनैतिहासिकतेचे धुके दूर करण्याचा प्रयत्न पांडुरंगराव देसाई यांनी केला त्यालाही फार वर्षे झाली[१] 'पुरंदरदास हे पुण्याजवळच्या पुरंदरगडचे' हा समज कसा अनैतिहासिक आहे हे देसाई यांनी कसे दाखवून दिले आहे ते पाहण्यापूर्वी, पंडित आवळीकर यांनी पुरंदरदासांसंबंधी लिहिताना या संदर्भात केलेली विधाने प्रथम नोंदली पाहिजेत आणि नंतर दुरुस्त केली पाहिजेत : (अ) "पुरंदरदास आणि एकनाथ यांच्यांविषयी संशोधन करताना पुढील गोष्टींवर भर देणे आवश्यक आहे, असे मला वाटते. पुरंदरदास हे जर पुण्याजवळच्या पुरंदरचे, तर त्यांना मराठी येत होत काय ? त्यांच्या संबंधी त्या बाजूस काही माहिती मिळते काय ?"...[२]

(ब) "शिवाय पुरंदरदास हे मूळचे सासवडजवळच्या पुरंदरचे हे खरे असेल तर त्यांचा मराठी भाषा व ज्ञानदेव यांच्याशी परिचय असावा असे मानण्यात काहीच अडचण नाही....

"तसेच पुरंदरदासांच्या भाषेतीलही मराठीपण शोधले पाहिजे असे मला वाटते."[३]

(क) "पुरंदरदासांचा शोध घेताना, त्यांचे (पुण्याजवळील) पुरंदरगडावरील (पूर्वायुष्यातील) वास्तव्य; पंढरपूरला जाणे–येणे व विठ्ठल भक्ती या गोष्टी मला महत्त्वाच्या वाटल्या आहत."[४]

या विधानांतील पुरंदरगडविषयक निर्देश अनैतिहासिक म्हणून वगळला पाहिजे आणि तेवढी दुरुस्ती केली पाहिजे. तसेच पांडुरंगराव देसाई यांच्या १९६४ मधील लेखाकडे, १९६४ नंतरच्या आपल्या लेखनात अज्ञानाने, अनवधानाने वा आळसाने दुर्लक्ष झाले याचा आवळीकरांना खेद वाटतो हेही नमूद करावयास हवे. संशोधनात हे अक्षम्यच मानावयास हवे.

आता पांडुरंगराव देसाई यांच्या लेखाकडे वळू. देसाई लिहितात : "Uncertainty prevails regarding the place of this Saint's birth and domicile. It is traditionally believed that he hailed from Purandaragad near Poona. But this belief can be challenged. For one thing, there is no trace of Kannada anywhere near Purandaragad, which is an out and out Marāthi region of Mahārāshtra. And

Shri Purandara and his family were perfect scions of Karnāṭaka. No grounds exist to indicate that this family went from Karnāṭaka and settled in Mahārāshtra, and particularly in a fortified settlement of military importance, devoid of civil life, which is Purandaragad."[५]

देसाई यांचे हे म्हणणे भाष्याविना मान्य करावयास हरकत नाही. पुरंदरदासांचे शिष्य विजयदास यांनी आपल्या एका पदात आपले गुरु पुरंदरगडचे असल्याचा उल्लेख केला. तेव्हापासून हा समज प्रचलित झाला असला तरी, तो विजयदासापूर्वीही असण्याचा आणि विजयदासांनी त्याचा पुनरुच्चार केला असण्याचा संभव आहे. पुरंदरदास स. १५६५ मध्ये वैकुंठवासी झाले. विजयदास हे त्यांचे साक्षात शिष्य नव्हते, ते १८ व्या शतकातले. विजयदासांना त्यांच्या स्वप्नात पुरंदरदासांनी गुरुपदेश दिला, हेही विजयदासांनी दिलेली माहिती तपासून घेताना ध्यानी ठेवले पाहिजे.

'पुरंदरदास' आणि 'पुरंदरगड' या नामसादृश्यातून तसेच उत्तर कर्नाटकापासून फार दूर नसलेल्या आणि आदिलशाहीचाच भाग असलेल्या, शिवाजी महाराजांच्या आदिलशाही व मोघल यांच्याशी चाललेल्या संघर्षामुळे झालेल्या 'पुरंदरगड'–परिचयातून पुरंदरदासांचे नाव पुरंदरगडाशी जोडले गेले असणे शक्य आहे. पुरंदरगडावरही या समजास पुष्टी देणारे काहीही नसल्याने प्रस्तुत समज निराधार आणि भ्रामक आहे हा देसाई यांचा निष्कर्ष[६] तर्कशुद्ध आहे. तसेच पुरंदरदास हे उत्तर कर्नाटकातील रहिवासी होते हा त्यांचा निर्णय सयुक्तिक आहे. "Under the circumstances, we have to search for Shri Purandara's domicile somewhere else. Since no other direct clue is available to determine the issue, We have to fall back upon circumstantial evidence, such as the Kannaḍa language, vocabulary and the mode of expression used in his compositions and suggest a probability. A critical study of the above leads one to hold the view that he belonged to the north Karnāṭaka area."[७]

'गुरु पुरंदर विठ्ठल' हा दास कवी १९ व्या शतकातील असावा, परंपरा (?) मानते तसा तो तो पुरंदरदासांचा पुत्र नव्हे; त्याचे पुरंदरदासविषयक आख्यान हे एक अद्भुत भारुड आहे; त्यातील 'पुरंदरपट्टण' हाही चुकीचा ग्रामनिर्देश आहे, हे देसाई यांचे मत[८] सप्रमाण म्हणून ग्राह्य आहे.

हंपीजवळ सापडलेल्या कमलापूर ताम्रपटाच्या[९] अभ्यासातून पुरंदरदासांसंबंधी मिळणारी ऐतिहासिक माहिती एवढीच आहे.

" 1. The gotra of Śri Purandara was Vasishṭha and his Śakhā Yajus.

2. In the year of the charter, i. e. 1526 A. D. at least three of his sons were still living. They were Lakshmaṇadāsa, Hebaṇadāsa and Madhvapadāsa."[१०]

मराठीतील पुरंदरदासविषयक लेखनात आवळीकर यांनी केलेला 'पुरंदरगडा'चा उल्लेख गाळणे आवश्यक असले, तरी पुरंदरदासाना मराठीचे ज्ञान असावे हा निर्देश मात्र तसाच ठेवावा लागेल. कारण उत्तर कर्नाटकात मराठी–कन्नड यांचे साहचर्य सहज होते. ■

संदर्भ

१. P. B. Desai, 'Historical Glimpses of Śri Purandara'; Journal of the Karnatak University, Humanities, Karnatak University, Dharnad, Vol. VIII, 1964, pp. 225-29.

२. पंडित आवळीकर, 'पुरंदरदास आणि एकनाथ'; प्रतिष्ठान, औरंगाबाद, जुलै–ऑगस्ट १९७७, पृ. १८.

३. पंडित आवळीकर, 'ज्ञानदेवांचे (?) एक कूट पद', महाराष्ट्र साहित्य पत्रिका, ऑक्टोबर–नोव्हेंबर–डिसेंबर, १९७७, पृ. २७–३१.

४. पंडित आवळीकर, 'चोखामेळा, पुरंदरदास आणि वेंद्रे', नवभारत, वाई, एप्रिल १९८३; पृ. ३०.

५. Opp. Cit. Journal at the Karnatak University, pp. 225-226.

६. Ibid, p. 226 : " Thus examined from whatever point of view, the tradition seeking to link up the fort with the Saint stands totally unsupported. Nay, it is even misleading, and has misled one and all so far." या 'वाट चुकलेल्या'–'गुमराह' मंडळीत पंडित आवळीकर पण आहेत !

७. Ibid, p. 227.

८. तत्रैव, p. 227.

९. हा ताम्रपट विजयनगरच्या कृष्णदेवरायाने व्यासतीर्थ नामक ब्रह्मण्यतीर्थांच्या शिष्याला दिला असून त्याचा काल 'शालिवाहन शके १४४७, पार्थिव, फाल्गुन शु. १२' असा आहे.

१०. Opp. Cit. Jounal of the Karnataak University, p. 229.

—

'विठ्ठल' नाममुद्रा धारण करणारे कवी

मीरा घांडगे

मराठी वाङ्मयात एकाच नावाने रचना करणारे अनेक कवी आढळून येतात. आजोबाचे नाव नातवाला ठेवायची प्रथा समाजात रूढ असल्याने एकच नाव पिढीआड चालत येऊ लागले. ऐतिहासिकतेची जाणीव नसल्याने त्या कवींच्या काव्यात सरमिसळ होऊ लागली. १९ व्या शतकांत पाश्चात्य वाङ्मयाच्या संपर्काने संशोधनाची अभ्यासकांना जाणीव झाली व त्या पद्धतीने अभ्यास सुरू झाला. "काव्यरत्नावली"-तून प्राचीन मराठी काव्य संपादन होऊन प्रसिद्ध होऊ लागले. त्या प्रसिद्धीमुळे वाङ्मयात झालेली अशा प्रकारची सरमिसळ अभ्यासकाच्या लक्षात येऊ लागली व संशोधनास चालना मिळाली. नामदेव, ज्ञानदेव एक की अनेक अशा प्रकारचे वाद निर्माण झाले.

प्रस्तुत लेखात प्राचीन मराठीत (प्रारंभकाळ ते १८५० पर्यंत) विठ्ठल या एकाच नावावर रचना करणाऱ्या कवींचा शोध घेतला आहे.

काळ अनुपलब्ध असलेले स्फुट व दीर्घ रचना करणारे विठ्ठल कवी

स्फुट रचना करणाऱ्या कवींमध्ये व विठ्ठल या नावाने रचना करणाऱ्या कवीचे "नामदेवाचा नैवेद्य" या नावाचे लहानसे प्रकरण उपलब्ध असून त्याच्या १०३ ओव्या आहेत. हे कवी नामदेवाचे शिष्य किंवा नामदेव पुत्र विठोबाही असू शकतील. त्र्यंबक पुत्र विठ्ठल यांचा अमुद्रित स्वरूपाचा "सहजस्थितीविलास" हा एकमेव ग्रंथ उपलब्ध आहे. आरतीकार विठ्ठलाची रामाची व कृष्णाची आरती उपलब्ध आहे.

दीर्घ रचना करणाऱ्या कवींमध्ये अनंतसुत विठ्ठल किंवा विठ्ठल अनंतसुत यांची अमुद्रित स्वरूपाची "कालियामर्दन" (ओ. सं. ४०) व गुरुस्तवन (अपूर्ण) अशी ग्रंथरचना आहे. आख्यानकाराच्या परंपरेतील या विठ्ठल कवींच्या गुरूचे नाव केशव असून त्याचे सखूचरित्र, शबर्याख्यान, नौकाक्रिडन, व भानुदास चरित्र ही चार साकी वृत्तातील काव्ये अनेक कवीकृत लघुकाव्यमालेतून मुद्रित झाली आहेत. ग्रंथकार विठ्ठल पुरंधर याची कर्नाटकात नेमणूक होती असे अर्वाचीन कोशकार म्हणतात. याचा अमुद्रित असा "बारामास" हा एकमेव ग्रंथ उपलब्ध आहे. टीकाकार विठ्ठल ब्रह्मानंदाची चतुःश्लोकी भागवतावरील टीका अमुद्रित स्वरूपाची आहे.

काल उपलब्ध असलेले स्फुट व दीर्घ रचना करणारे विठ्ठल कवी

अंदाजे १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात दत्तनाथ उज्जनीकरांचे शिष्य विठ्ठल (पदकार) यांची कविता अल्प संख्येने उपलब्ध आहे. विठ्ठल काशीराज उर्फ रंगानुजतनय (याचा कालखंड अंदाजे श. १६०० इ. स. १६७८–श. १६५०–इ. स. १७२८) श्रीधरकवींचे चुलत–चुलते आत्यास्वामी यांचे हे पुत्र असून यांनी काही पदे रचली आहेत. पदांमध्ये ते स्वतःला "रंगानुजतनय" म्हणवितात.

महाराष्ट्र सारस्वतकार चूडामणिसुत विठ्ठलाची (शके १७३२–९७) माहिती देतात. मराठवाड्यात चाकूर या गावी काव्यरचना करणाऱ्या या कवीच्या कवितेत आख्याने, पदे व अनुवाद (उदा. शतकत्रय) असे तीन प्रकार आढळतात. विठ्ठल कळपूरकर याचा कालखंड अंदाजे श. १५३६–इ. स. १६१४ असून याने लिहिलेली रासक्रिडा (पद्यसंख्या २३६) उपलब्ध आहे. ज्याचा काळ निश्चित माहिती आहे अशाच श्लोकरचनेत या काव्याचा पहिला क्रमांक लागतो असे या काव्याचे संपादक ज. शा. देशपांडे म्हणतात म्हणून या काव्याला ऐतिहासिक दृष्टयाही महत्त्व आहे. संतचरित्रकार विठ्ठलाने "मधुपुरीमहात्म्य" व "धर्मपुरीमाहात्म्य" असे दोन संतचरित्रपर ग्रंथ

रचले असून त्यात अनुक्रमे स्वामी सच्चिदानंदाचे व संत कोलबाजी महाराज यांचे चरित्र आले आहे. याच्या नावावर काही स्फुट रचना असून याचा कालखंड अंदाजे श. १७५१–इ. स. १८२९ असा दिसतो.

विठ्ठल केरीकर/विठ्ठल नरसिंह उर्फ विठ्ठल साखळकर (इ. स. १७१५ ते १७८९) केरी गावचे राहणारे म्हणून केरीकर या नावाने ओळखले जातात. सोहिरोबा आंबिये यांचे समकालीन असून या विद्वान कवीने काशीच्या पंडीताकडून मानपत्र मिळविले होते. याच काळात आंध्रकवी गोपाळ कुंदावोझ्झ यांनी रचलेल्या सावंतविजय नावाच्या संस्कृत काव्यांचे मराठी ओवीबद्ध भाषांतर विठ्ठलाने केले आहे. (इ. स. १७८१) त्याशिवाय यांची वामनचरित्र शुकरंभा-संवाद, कवीरकथा, गजगौरीव्रत इ. आख्याने व पदे काव्यसंग्रहातून प्रसिद्ध झाली आहेत. याची स्फुट रचना ओवीबद्ध, आर्याबद्ध तसेच श्लोक, पदे, आरत्या दिंड्या, साक्या अशा स्वरूपाची आहे.

विठ्ठल बिडकर, विठ्ठल अनंत क्षीरसागर, विठ्ठल कवी, विठ्ठल चित्रकवी अशा अनेक नावाने ओळखला जाणारा हा कवी आहे. यांचा काळ अंदाजे श. १५५०/इ. स. १६२८–श. १६१२/१६९० असा आहे. याचे कुलदैवत श्री. पांडुरंग उर्फ विठ्ठल होते. हे पंढरीची वारी नेमाने करीत असत. म्हणूनच काव्यात अनेक ठिकाणी "विठ्ठलदास" असे म्हणवितात. या विठ्ठल बिडकराच्या नावावर रुक्मिणी स्वयंवर, पांचाली-स्तवन, सीतास्वयंवर, रसमंजरी, द्रौपदीवस्त्रहरण, विद्वज्जीवन, बिल्हणचरित्र व काही स्फुटपदे मुद्रित स्वरूपात आहेत. तर कमलाशारदा संवाद अमुद्रित असून एकूण ९ ग्रंथ याच्या नावावर आहेत. आपल्या सर्व ग्रंथांवर हे विठ्ठल कवी आपले नाव गाव व इतर माहिती देतात.

यांच्या काव्यरचनेचे वैशिष्ट्य म्हणजे यांनी आपल्या पांडित्याच्या बळावर संस्कृतातील नवी वृत्ते मराठीत आणली. पण चमत्कृतीच्या हव्यासा-मुळे कलाकृतीत जीवंतपणा नाही. म्हणूनच ती वाचकांपर्यंत पोहचली नाही. त्यामुळे रचनेत विपुलता असली तरी सामराज, रघुनाथ पंडिता-पेक्षा हा कवी खालच्या दर्जाचा ठरतो.

रंगनाथ निगडीकरांचे धाकटे बंधू विठ्ठल रंगमूर्ती उर्फ आत्यास्वामी उर्फ आत्यारामस्वामी यांचा जन्मकाल माहीत नसून समाधीकाल श. १६२६ पार्थिव श्रावण व. ८/इ. स. १७०४ असा आहे. यांनी आपल्या थोरल्या बंधूच्या बरीच रचना केलेली असून कोणाची कोणती हे ओळखणे कठीण झाले आहे. नारद चरित्र, रामदासस्वामी चरित्र, नारदाची लावणी, पदपदांतरे अशी रचना अमुद्रित स्वरूपात आहे.

दोन भाषेतून रचना करणारे विठ्ठल कवी

मराठी व संस्कृत अशा दोन्ही भाषेतून रचना करणारे विठ्ठल कवी आहेत.

काल अनुपलब्ध असलेले विठ्ठल दीक्षित यांची समर्थवाग्देवता मंदिरात हस्तलिखित संग्रहात कवीची वल्लभाष्टक आणि सप्तश्लोकी या संस्कृत रचना व गीताकडके ही मराठी रचना सापडते.

वैद्यक ग्रंथकार विठ्ठल गलंड यांचा काल अंदाजे १४ वे शतक असून वैद्यकावर मराठीत ग्रंथरचना करणारा म्हणून विठ्ठल अशा दोन्ही नावाने करतात. यांच्या नावावर रसराज लक्ष्मी व रससिंधु हे दोन संस्कृत ग्रंथ असून वैद्यचंद्रकोरिका, रसकौमुदी, वैद्यसारसंग्रह, हितोपदेश, रसरत्नप्रदीप हे वैद्यक विषयातील मराठी ग्रंथही आहेत.

मुकुंदराजाच्या पंधराव्या पिढीतला दत्तवरद विठ्ठल नानासाहेब पेशवेकालीन कवी होय. याचा जन्म माघ वद्य २, मंगळवार शके १६४३/इ. स. १७२१ असा आहे. प्रसिद्ध इतिहास संशोधक रा. चि. ढेरे यांनी "शोधशिल्प" या ग्रंथात त्याच्या चरित्रात्मक माहितीबरोबरच त्याची जन्मपत्रिकाही दिली आहे. प्राचीन मराठी वाङ्मयात ज्या कवीची जन्मपत्रिका उपलब्ध आहे असा हा एकमेव भाग्यवान कवी आहे.

विठ्ठल कवीचे उपास्य दैवत दत्तात्रेय, त्याचे एक मंदिर अकोले गावी (ता. अकोले, जिल्हा अहमदनगर) आजही पहावयास मिळते. म्हणूनच हा कवी विठ्ठल, दत्तवरदविठ्ठल, अवधूतविठ्ठल, वणी विठ्ठल अशा अनेक नावांनी रचना करतो. या कवीने रामायण, महाभारत, भागवत, प्रबोध

अनुक्रमणिका

प्रभाकर यासारखे दीर्घ ग्रंथ, अनेक स्तोत्रे; रामाष्टम्, भागीरथ्याष्टकम् यासारखी संस्कृत अष्टके, स्तोत्रे अशी मराठी व संस्कृत भाषेतील रचना आहे. सुमारे सहासष्ट हजार ओव्या इतकी प्रचंड काव्यरचना पुणे विद्यापीठ; जयकर ग्रंथालयाच्या संग्रही आहे व ही सर्व अप्रकाशित आहे. संपूर्ण विठ्ठल कवीत प्रचंड रचना करणाऱ्या कवींमध्ये या कवीचा प्रथम क्रमांक लागतो.

या विठ्ठल कवीच्या पित्याच्याही (रामकृष्ण) काही रचना उपलब्ध आहेत. म्हणूनच श्री. रा. चिं. ढेरे यांच्या मते, विठ्ठल कवीला लाभलेला कवित्वाचा पैतृक वारसा त्यांनी आपल्या विशाल ज्ञानाने व प्रतिभेने समृद्ध केला आणि मुकुंदराज परंपरेतला सर्वात मोठा कवी म्हणून गौरवाने अशी प्रचंड रचना केली आहे. (म्हणूनच मूळचे "घुमरी" उपनाम असलेल्या या कवीच्या घराण्याला विठ्ठल कवीच्या प्रचंड काव्यरचनेमुळे "कवी" हे उपनाम प्राप्त झाले) संतांच्या निपंतांच्या सरणीचा संगम साधून जयदेवाच्या पदलालित्याचे वारंवार स्मरण घडविणारा हा जबरदस्त कवी असल्याचे श्री. रा. चिं. ढेरे आपल्या लेखात नमूद करतात.

संप्रदायाचे बिरुद लावणारे विठ्ठल कवी

सांप्रदायिक कवींमध्ये आपल्या नावापुढे संप्रदायाचे बिरुद लावण्याची प्रथा होती. उदा. आनंददास, रमावल्लभदास, कृष्णदास त्याचप्रमाणे गोपीनाथ, गणेशनाथ, उद्बोधनाथ यासारखे नाथ संप्रदायी कवी आपल्या नावापुढे "नाथ" हे बिरुद लावतात. विठ्ठल या नावाच्या बाबतीतही विठ्ठलनाथ, विठ्ठलदास, विठ्ठलरुद्र अशी नावे आढळतात. अर्थात या कवींची मूळ नावे माहीत नसल्याने ही नावे विठ्ठल नावापुढे संप्रदायाचे बिरुद असलेली नावे असावीत असे वाटते.

अशा विठ्ठल कवींमध्ये विठ्ठलदासांची संख्या जास्त आहे. पहिला विठ्ठलदास हा यजुर्वेदी देशस्थ ब्राह्मण असून यांचे सखिपुस्तक ही शृंगारपर रचना, त्याशिवाय गरुडगर्वहरण, भक्तलक्ष्मण, रामपर व ज्ञानपर पदे हस्तलिखित आहेत. दुसऱ्या विठ्ठलदासाचे जानकी—स्वयंवर, रुक्मिणी-स्वयंवर आणि पदपदांतरे अशी रचना आहे. तिसऱ्या विठ्ठलदासाची (गुरुधुंडी) रासक्रिडा अमुद्रित आहे. चवथ्या विठ्ठलदास सोम याचे एकादशी महात्म्य व पदे अमुद्रित आहेत. पाचव्या पदकार विठ्ठलदासीचे रामपर पद अमुद्रित आहे. या सर्व विठ्ठलदासांचे काल उपलब्ध नाहीत. अंदाजे इ. स. च्या १७ व्या शतकातील सहाव्या विठ्ठलदासाची स्फुट रचना जगनाडे यांच्या वहीत उपलब्ध आहे.

कोल्हापूराजवळ आजरे गावी राहणारा विठ्ठलनाथ याची आठ पदे प्रसिद्ध झाली आहेत. मात्र याचा काल उपलब्ध नाही. महाराष्ट्र सारस्वतकार अश्वमेधकर्त्या विठ्ठलनाथाची (अंदाजे इ. स. १६०० ते १७००) माहिती देतात. गजगौरीव्रत हा काव्यग्रंथ व काही पदरचनाही याच्या नावावर आढळते. काल उपलब्ध नसलेल्या विठ्ठलरुद्राचे तुलसीमाहात्म्य अमुद्रित स्वरूपात मिळते.

विठ्ठलनावाशी संबंधित असलेले कवी

विठ्ठल नावापुढे आत्मज, किंकर; सुत, नंदन अशी बिरुदे लावून रचना करणारे कवी आहेत. अशा कवींपैकी मूळ नाव कोणाचेही माहित नसले तरी या कवीचे नाव "विठ्ठलच असेल काय ?" अशी शंका निर्माण होते.

पाताळकांड रामायण कर्ता विठ्ठल किंकर हे नाथ संप्रदायाच्या पाच प्रमुख शाखांपैकी एका शाखेतील असून पाताळकांडाची प्रत शके १७१२—इ. स. १७९० मधली आहे. म्हणून हा ग्रंथकार त्यापूर्वी होऊन गेला असावा असा निष्कर्ष काढता येतो. रामदास संप्रदायाची रोकडाराम यांचे शिष्य विठ्ठल किंकर पदकार असून रोकडारामावरील एक अष्टक मुद्रित स्वरूपात आहे. विठ्ठलतनयश्याम उर्फ विठ्ठलतनय या नावाचा कवी पदकार असून डफगाणे, रामपरपद, बोधपरपद इ. सारख्या रचना आहेत. विठ्ठल दीक्षितसुत पदकार होता. पदकार विठ्ठलसुताची पदपदांतरे अमुद्रित स्वरूपाची आहेत. विठ्ठलसुत बलवत्कवी हा आरतीकार असून गणपती, दुर्गा, नृसिंह; माहेश्वरी, शंकर, श्रीराम, सत्यनारायण इ. सात

अनुक्रमणिका

आरत्या मुद्रित स्वरूपात उपलब्ध आहेत. विठ्ठलसुतशामा या रामदासी कवीची शिवी चक्रवर्तीची कथा हस्तलिखित स्वरूपात मिळते. आरतीकार विठ्ठलसुतात्मजाची अंबेची आरती अमुद्रित आहे. पदकार विठ्ठलहरिसुताची रामाची आरती अमुद्रित असून आरतीकार विठ्ठलात्मजाची दत्त, तुळशी, शंकर, कृष्ण ह्यांच्या आरत्या मुद्रित स्वरूपात आहेत. पदकार विठ्ठलनागेशात्मजाचे संतलक्षणपद व इतर पदपदांतरे अमुद्रित आहेत. कवी व टीकाकार विठ्ठलनंदनाची सप्तशती टीका, चंडिकामाहात्म्य अथवा सप्तशती, श्लोक व पदपदांतरे हस्तलिखित स्वरूपात आहेत. या कवींमध्ये जवळजवळ सर्वच कवींचे काल उपलब्ध नाहीत. तर विठ्ठलतनय उर्फ विठ्ठलतनयश्याम याचे नाव "श्याम" आणि विठ्ठलसुतशामा याचे नाव शामा असावे असे वाटते. पण इतर कवींची मूळ नावे माहित नाहीत.

अपभ्रंशित विठ्ठल नाव वापरणारे कवी

मराठी वाङ्मयात "विठ्ठल" नावाच्या अपभ्रंशाने विठू, विठा, विठोबा अशा नावाने रचना करणारे कवी आहेत. इ. स. च्या १४ व्या शतकातील नामदेवाचा धाकटा मुलगा विठा याने रचिलेले ८५ अभंग श्रीसकळसंतगाथेत असून त्यात जनीचे चरित्र; नामदेव चरित्र व संतमालिका अशी रचना आहे. "नामदेवाचा नैवेद्य" हे प्रकरणही यानेच लिहिले असावे असे मत व्यक्त केले जाते. १६ व्या शतकातील एकनाथ पंचकातील देवीउपासक संतकवी विठा रेणुकानंदन याची काही स्फुट कविता, दहा–बारा अभंग व काही पदे अशी अत्यंत अल्प प्रमाणात रचना मिळते. याच्या नावावर सीतास्वयंवराचाही उल्लेख आढळतो. श्री समर्थशिष्य त्रिंबकराज (१७ व्या शतकातील) यांचा शिष्य विठा पदकार होता. विठा जैन नावाचा कवीही पदकार होता.

विठू कानडा, कानडिया विठ्ठल, कानड्या विठ्ठल अशी अनेक नावे धारण करणाऱ्या या कवीची रचना पदपदांतराच्या स्वरूपातील आहे. विठो किंवा विठ्ठलनाथ या नावाचा ज्ञानदेवाच्या परंपरेतील कवीची रचना गुरुगीता, टीका, ओव्या अशा स्वरूपाची आहे. बहिणाबाई पुत्र विठोबा याची तुकारामाची व बहिणाबाईची आरती उपलब्ध आहे. महिपतीपुत्र विठोबा तहाराबादकर याला पदे रचण्याचा नाद होता. काल अनिश्चित असलेल्या विठोबा नावाच्या कवीची अमुद्रित स्वरूपाची पदपदांतरे आहेत. विठो विश्वनाथाचे अमुद्रित स्वरूपाचे गणपतीस्तोत्र आहे.

विठ्ठलाचे स्त्रीरूप

विठाबाई नावाची संतकवयित्री असून (श. १७१४/इ. स. १७९२) हिचे ४००० अभंग व काही पदे असल्याची माहिती मिळते. त्यापैकी ६०० अभंग व ६–७ पदे प्रकाशित असून बाकीची रचना अप्रकाशित आहे.

एकंदरीत या सर्व निरीक्षणावरून काही निष्कर्ष काढता येतात.

(१) इतर कोणत्याही कवींपेक्षा विठ्ठल ही नाममुद्रा धारण करणाऱ्या कवींची संख्या जास्त आहे.

(२) एकंदर विठ्ठल कवींत स्फुट रचना करणाऱ्या कवींची संख्या जास्त आहे.

(३) एकंदर विठ्ठल कवींपैकी बऱ्याच विठ्ठल कवींची रचना अमुद्रित स्वरूपाची (अप्रकाशित) आहे.

(४) या सर्व विठ्ठल कवींमध्ये काल अनुपलब्ध असलेल्या कवींची संख्या जास्त आहे.

(५) ज्या कवींचा काल माहीत आहे अशा कवींचा काल त्यांच्या रचनेवरून अंदाजे ठरविलेला दिसतो. म्हणजे त्यांच्याही काळाची निश्चितता सांगता येत नाही. याला दत्तवरदविठ्ठल हा एकच कवी अपवाद आहे. कारण त्याची जन्मपत्रिका उपलब्ध आहे.

(६) या सर्व कवींमध्ये विठ्ठल हे टोपण नाव धारण करून रचना करणारा कवी दिसत नाही.

पूर्ण संशोधनाच्या अंतीच मराठीतील या सगळ्या विठ्ठल कवींचे व्यवस्थित परिगणन होणे शक्य आहे.

■

संदर्भ टीपा :

१. खानोलकर गं. दे., मराठी वाङ्मयकोश, खंड १, मराठी ग्रंथकार (इ. स. १०५०–१८५७) महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई १९७७.

२. देशपांडे अ. ना., मुख्य संपादक, मराठी वाङ्मयकोश, प्राचीन खंड, नागपूर विद्यापीठ प्रकाशन १९७४.

३. भावे वि. ल., महाराष्ट्र सारस्वत, खंड १, आ. ६ वी. १९८२.

४. तुळपुळे शं. गो., महाराष्ट्र सारस्वत, खंड २, पुरवणी १९८२.

५. देशपांडे अ. ना., प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड १–७. व्हीनस प्रकाशन, पुणे.

६. पेठे म. प. आणि येरवडेकर, शांता. १८ व्या शतकातील एक अप्रसिद्ध कवी दत्तवरद विठ्ठल. म. सा. प. वर्ष १७ वे, अंक २ जाने. १९७०-६०-६९.

लक्ष्मण वराटे चाळ, वारजे माळवाडी,
पो. कोथरूड, पुणे–४११ ०२९



वसुधा पाटील, मुंबई

मराठी वाङ्मयेतिहासाची तत्त्वमीमांसा

(लेखांक ३ रा)

मधुकर रामदास जोशी

इतर कोणत्याही भारतीय भाषा वाङ्मयाप्रमाणे मराठी वाङ्मयेतिहास सुद्धा मूलतः भारतीय वाङ्मयाचा इतिहास आहे. भारतवर्ष हा वाङ्मयाचा विशाल महासागर आहे. भाषा विविध असल्या तरी वाङ्मय मात्र भारतीय आहे. या विशाल महासागराला मिळणाऱ्या सर्व नद्या व प्रवाह भारतीय जीवनाचे स्पंदन आहे. युगायुगातील भारतीयांच्या धारणा ज्या संकल्पनेने प्रवाहित झाल्या त्या सर्वच प्रवाहाचे रूप वाङ्मयोदधीच्या रूपाने प्रगट होत असल्यामुळे समस्त भारतवर्ष हा मराठी वाङ्मयेतिहासाचा मूल गाभा ठरतो. म्हणून का अन्य इतर भाषेप्रमाणेच मराठी वाङ्मयेतिहासाची उभारणी व आखणी भारतवर्षाला केंद्रस्थानी निश्चित करूनच करणे केव्हाही सयुक्तिक ठरेल. मराठी ग्रंथकारांनी मराठीप्रमाणेच अन्य भारतीय भाषेतदेखील लेखन केले आहे व ज्यांना शक्य झाले त्यांनी भारतीय साहित्याचे रूपांतर वा अनुवाद अन्य भाषेत केले आहेत. प्राचीन मराठी ग्रंथकारांनी मराठीप्रमाणेच संस्कृत, हिंदी, कन्नड, दख्खनी हिंदी, गुजराथी, तमिळ व तेलगू भाषेत रचना केल्या. नामदेव, एकनाथ व तुकारामादी संतांनी व्रज भाषेत रचना केल्या. पुढे ते लोण ग्वाल्हेर नृपती महादजी शिंदे व वैदर्भीय संत गुलाबराव महाराजापर्यंत येऊन पोचले. ह्या ग्रंथरचना केवळ संतांचे भाषाप्रेम दाखवितात असे नव्हे तर त्यांच्यासमोर भारतवर्ष होता हेही त्यांच्या रचनेवरून स्पष्ट होते. परंतु संतांच्या इतर भाषेतील ग्रंथरचना त्या त्या भाषा वाङ्मयाच्या इतिहाससंबंधी काही प्रश्न निर्माण करून आजवरच्या भाषा वाङ्मयेतिहासाच्या पुनर्विचाराला चालना देतात. नामदेवांनी पंजावी कवने केली पण त्यांच्या पदांची भाषा 'शुद्ध पंजाबी' नसून तीत व्रज, अवधी, राजस्थानी, मारवाडी, मराठी इ. भाषांची खिचडी दृष्टीस पडते. हा वाङ्मयेतिहासकारांचा निष्कर्ष केवळ चिन्त्यच नसून हिंदी वाङ्मयेतिहास संदर्भातदेखील तेवढाच लक्षणीय ठरतो. नामदेवांच्यावेळी आजची 'पंजावी' भाषा होती काय ? ज्या 'पंजाबी'त किंवा 'दख्खनी'त मराठी संत रचना करताना आढळतात त्या रचनांचे त्या त्या भाषा वाङ्मयेतिहास दृष्टीने काय स्थान आहे ? याशिवाय वाङ्मयेतिहासात प्रस्थापित झालेले अनेक निष्कर्ष रद्द होतात. उदा. हिंदी वाङ्मयेतिहासकारांनी भक्तिआंदोलनाची समाप्ती व छायावादाच्या प्रारंभबिंदूची चर्चा करताना छायावादाने भक्ती आंदोलन जवळ जवळ निकालात काढले अशा स्वरूपाचा निष्कर्ष काढला. परंतु मौज अशी की, ज्यावेळी हिंदी वाङ्मयात छायावादाला प्रारंभ झाला त्यावेळी महाराष्ट्रातील संत मात्र व्रजभाषेत भक्तिरचना करीत होते. तेव्हा व्रजभाषेत भक्तिआंदोलन संपले की त्याचा विस्तार महाराष्ट्रात झाला ह्या प्रश्नाची उकल हिंदीप्रमाणेच मराठी वाङ्मयेतिहासकारांनी करणे आवश्यक ठरते. तसेच भक्तिवाङ्मयाच्या निर्मितीचा जो कालखंड हिंदी वाङ्मयेतिहासकारांना अभिप्रेत आहे तो सयुक्तिक आहे काय ह्याचाही विचार करावा लागतो. वाङ्मयनिर्मिती, त्यांचा विस्तार, नवनवीन निर्मिती केंद्रे व कालखंड हे जर परस्पर संबंधित असतील, तशी ती आहेतच तर

विस्तारित केंद्रामधील वाङ्मयामुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा उहापोह किंवा दखल घेणे आवश्यक ठरते. अशाप्रकारे मराठी, हिंदी, कन्नड, तमिळ इत्यादी सर्वच वाङ्मयेतिहास एकमेकाजवळ येतात व परस्परांचे प्रश्न सोडण्यास मदत करतात. शिवाय ज्या मराठी लेखकांनी हिंदीसारख्या भाषाभगिनीप्रदेशात वास्तव्य करून मराठी वाङ्मयनिर्मिती केली किंवा ज्यांनी हिंदी वाङ्मयनिर्मिती केली त्या लेखकांच्या सारस्वत निर्मितीचे स्वरूप व त्यामधून निर्माण होणारे प्रश्न महाराष्ट्रात राहून वाङ्मयनिर्मिती करणाऱ्या लेखकांहून भिन्न असतात. अशाप्रकारे मूळ भाषा वाङ्मयनिर्मितीबरोबरच अन्य भाषाक्षेत्र कक्षातील वास्तव्यामुळे निर्माण झालेली वाङ्मयनिर्मिती लक्षात घेऊनच भाषा वाङ्मयेतिहासातील विविध समस्यांची किमान जाणीव वाङ्मयेतिहासकारांनी मुखरित केली पाहिजे. तेव्हा "रचनाकार एक पण रचना मात्र बहुभाषिक" ह्या सूत्रांची उकल कोणत्याही वाङ्मयेतिहासात येणे अपरिहार्य ठरते. केशवसुत, माधव ज्यूलिअन, मर्ढेकर ह्या आधुनिकांनी मराठीप्रमाणेच इंग्रजीत रचना केली. या रचनांची समीक्षा इंग्रजी साहित्यशास्त्रानुसार केल्यास इंग्रजी वाङ्मयेतिहासात केशवसुत, माधव जूलियन, मर्ढेकर यांना मिळणारे स्थान व त्यांची होणारी स्थापना मराठी वाङ्मयेतिहासाप्रमाणेच राहील काय असा प्रश्न कोणाही विचक्षणाच्या मनात निर्माण होतो. तसेच वामन, मोरोपंत, दासोपंतादींनी संस्कृत रचना केल्या आहेत. तेव्हा मराठी ग्रंथकारांच्या अन्य भाषिक रचनांची मीमांसा वाङ्मयेतिहास क्षेत्रातील महत्त्वपूर्ण समस्या ठरते. किंबहुना कोणत्याही महत्त्वपूर्ण ग्रंथकारांच्या संबंधात निर्माण होणाऱ्या विविध वाङ्मयीन प्रश्नांची व समस्यांची नोंद वाङ्मयेतिहासात येणे अपरिहार्य ठरते. यामधून वाङ्मयाचा पाया भरभक्कम करणारा ग्रंथकार व त्याची वाङ्मयीन रचनांचे वाङ्मयातील स्थान कोणते हा प्रश्न धसास लागतो. प्रायः विशेष ग्रंथकार हा पाया भरभक्कम करणाऱ्याहून वेगळा असतो. ह्या दोहोंची स्थापना करणे हा तर कोणत्याही वाङ्मयेतिहासाचा प्रधान विशेष असतो. वाङ्मयेतिहास क्षेत्रात ग्रंथकार व वाङ्मयनिर्माण करणाराच प्रधान असतो. कारण ग्रंथनिर्मितीप्रमाणेच तऱ्हेतऱ्हेचे नानाविध वाङ्मयप्रकार हाताळून आकृतीबंध रचणारा तोच असतो. शिवाय वाङ्मय संप्रदायांचे भरणपोषणदेखील तो करीत असल्यामुळे निर्मित वाङ्मयीन प्रकार व संप्रदायाचा उद्भव केंद्राशी प्रामुख्याने ग्रंथकारच संबंधित असतो. कोणताही ग्रंथकार जेव्हा एक किंवा एकापेक्षा अधिक वाङ्मयप्रकार हाताळतो तेव्हा त्याच्या निर्मितीक्षमतेचे नाते वाङ्मयप्रकाराशी असते. ग्रंथकाराने सारस्वतनिर्मितीसाठी निवडलेले वाङ्मयप्रकार व त्यांचा क्रम (कालानुक्रम नव्हे) यांचे अन्योन्य नाते दाखवून देण्याचे मोठेच दायित्व वाङ्मयेतिहासकारावर असते.

वाङ्मयप्रकारांचा नातेसंबंध जसा नायक ग्रंथकाराशी असतो तसा तो त्याच्या अनुसरण करणाऱ्यांचाही असतो. जेव्हा केव्हा नायक ग्रंथकाराच्या रूपाने प्रभावी किंवा एखादी भुरळ पाडणारी रचना होत जाते तेव्हा त्याच्या परिवार-मंडळातील रचनाकारांकडून देखील ग्रंथकाराने हाताळलेल्या वाङ्मयप्रकारांचे छंदासह अनुसरणात्मक लेखन होत असते. परंतु ह्याहीपेक्षा लक्षवेधक बाब म्हणजे एकाच रचनेची परिपूर्ती जेव्हा अनेकांकडून होते तेव्हा आशयासकट वाङ्मयप्रकारात देखील कोणताही बदल झालेला नसतो. आशय व वाङ्मयप्रकार हे ग्रंथकार व निर्मितीकाराशी संबंधित असतात पण नेमके तेच इतरांकडून देखील कसे परिपूर्ण होऊ शकतात हे एक वाङ्मयेतिहासातील उकललेले प्रमेय आहे. उदा. एकनाथांच्या भावार्थ रामायणाची रचना एकनाथाकडून अपूर्ण राहिली असता गावबा, मुक्तेश्वर व शेष कवींकडून परिपूर्ण झाली तसेच कृष्णदयार्णवांचा हरिवरदाग्रंथ उत्तमश्लोकाने सिद्धीस नेला. येथे रचना एक पण रचनाकार मात्र अनेक आहेत. गावबा; मुक्तेश्वर व शेष ह्यांनी (एकनाथांच्या) आशय व वाङ्मयप्रकारात कोणताही बदल न करता ग्रंथसिद्धीस नेला आहे. त्यांच्या शैलीत फारसा बदला झाला नाही. उलट एकनाथशैलीचे प्रत्यंतर गावबाच्या रचनेतही दिसून येते. तेव्हा आशय वा वाङ्मयप्रकारात यत्किंचित बदल न करतादेखील लेखक–

लेखकमंडळी रचना करीत असतात. असे लेखक बहुधा ग्रंथकार मंडळाशी संबंधित असतात. कोणत्याही भाषा वाङ्मयात ग्रंथकाराचा परिवार व मंडळ नेहमीच विद्यमान असते. या कविमंडळाचा शोध व त्यांच्या वाङ्मयीन परिवाराची ओळख नसली तर कोणताही वाङ्मयेतिहास अपूर्ण राहील. उदा. म. केशोबास, दामोदर व हिराईसा ह्या महानुभावीय ग्रंथकाराचे एक मंडळ व परिवार आहे. वारकरी पंथातदेखील निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई व चांगदेव पंचकांचे वाङ्मयीन मंडळ व सारस्वत परिवार आहे. तसेच तुकोबा व कान्होबा, रामेश्वरभट, बहिणाबाई; निळोबा व गोपाल-महाराज देहूकरांचे मंडळच परिवार आहे. अशा ह्या कविमंडळातच ग्रंथकाराची रचना प्रथम प्रगटते व तेथूनच ती सामाजिकांना माहित होत जाते. असा हा ग्रंथकारांचा परिवार व कविमंडळ एकीकडून ग्रंथकाराच्या आशय व वाङ्मयप्रकाराचे उद्‌बोधन करतात तर दुसरीकडून ग्रंथकाराच्या वाङ्मयीन संप्रदायाचे वाङ्मयीन परिचयकही असतात.

रचनेच्या बंधासह ग्रंथपूर्ती करणारे ग्रंथ हे ग्रंथकाराच्या प्रभावाने अनुकरणात्मक रचना करणाऱ्या ग्रंथकाराहून सर्वस्वी भिन्न असतात. कोणत्याही ग्रंथकाराच्या प्रभावाने उद्दीप्त होऊन त्याच्याप्रमाणे रचना करणारे मूलतः परपुष्ट असतात. पण ग्रंथपूर्ती करणारे मात्र तसे नसतात जेव्हा गावबा किंवा मुक्तेश्वरासारखा सिद्धहस्त लेखक एकनाथांच्या भावार्थ रामायणाची परिपूर्तता करतात तेव्हा आशय, बंध व वाङ्मयप्रकाराविषयक किती तरी प्रश्न निर्माण होत जातात. अशा प्रश्नांची जाण व समस्येची ओळख करून देण्याचे दायित्व वाङ्मयेतिहासकाराचे असते. परंतु आजचे सर्वच मराठी भाषी वाङ्मयेतिहास केवळ अपुरे आहेत असे नव्हे तर वाङ्मयीन प्रश्न व समस्यांची जाण नसलेले आहेत. उलट त्यांच्यावर कोणत्या ना कोणत्या वाङ्मयबाह्य विचारांचा प्रभाव आहे. वाङ्मयेतिहास हे केवळ शास्त्रच नव्हे तर स्वतंत्र विद्याक्षेत्र असल्यामुळे वाङ्मयेतिहासातील प्रश्न व समस्यांची उकल निखळ वाङ्मयीन प्रमेयांच्या आधारानेच केली पाहिजे.

तथापि, भाषा व समीक्षा ह्या दोन क्षेत्रातील अभ्यासकांनी वाङ्मयेतिहास क्षेत्रावर फार मोठ्या प्रमाणावर आक्रमण करून आपल्या शास्त्रांच्या कसोटीवर वाङ्मयेतिहासाकडे पाहिलेले आहे. पण मौज अशी की, ग्रंथनिर्मिती प्रमाणेच वाङ्मयीन प्रकारांची निर्मिती, त्यांचा वाङ्मयीन उपयोग व वाङ्मयीन संप्रदाय या सर्वांशी संबंधित असतो तो ग्रंथकार. आजपर्यंतच्या सर्वच भाषावाङ्मया-प्रमाणेच मराठी भाषावाङ्मयाचाही नियामक आहे तो ग्रंथकार, कोणतीही चळवळ वा प्रवाह नव्हे. कारण चळवळ वा प्रवाह समाजजीवनातून वाङ्मयीन क्षेत्रात जसेच्या तसे कधीही येत नसतात. रशियाप्रमाणेच युरोपमधील अनेक देशात साम्यवादी राजवट आली असूनही आजचे त्या राष्ट्रातील साहित्य मार्क्सवादाप्रमाणे आहे काय ह्याचे उत्तर मार्क्सवादाची झापडे लावून बसलेल्या तथाकथित अभ्यासकांनी दिले पाहिजे. तीच बाब दलित (?) साहित्याची आहे. वस्तुतः दलित साहित्य ही संज्ञा सयुक्तिक वा योग्य आहे काय ? की पूर्णार्थाने ते साहित्य वर्णवादी आहे ? संज्ञा व परिभाषेचा मुद्दा सोडला तरी ह्या तथा कथित दलित साहित्याने कोणताही नवीन व लक्षणीय वाङ्मयप्रकार निर्माण केलेला नाही. कविता, नाटक, कादंबरी, कथा हे सर्वच जुनेच व प्रामुख्याने पारंपारिक (साडे तीन टक्के वाल्यांचे) वाङ्मयप्रकार दलित साहित्यिकांनी हाताळलेले आहेत.

दलित साहित्य हे वास्तववादी आहे हे प्रमेय स्वीकारले तर त्याचा समावेश वास्तवतावाद व त्याचीच एक उपशाखा असलेल्या अतिवास्तवतावादातच होण्याची संभवनीयता असल्यामुळे; वाङ्मयीन संप्रदायदृष्टीने त्यांची कोणतीही स्वतंत्र चळवळ सिद्ध होऊ शकत नाही. शिवाय 'परतत्त्व स्पर्श' ह्या संतवाङ्मयाच्या कसोटीवर त्याची स्वतंत्रपणे समीक्षाही करता येते. तेव्हा कोणताही वाद वा चळवळ स्वतंत्र व स्वयंभू नसून कोणत्या ना कोणत्या वाङ्मयीन संप्रदायाशी संबंधित

असतेच असते. वाङ्मयीन संप्रदायाशी त्यांचे असलेले नाते न पाहता केवळ एखाद्या वादाची व चळवळीची जशी स्वतंत्र–मीमांसाही करता येत नाही व तसेच त्यांचे यथार्थ मूल्यमापन होत नाही. कामू–सार्त्र ह्या पाश्चात्य लेखकांच्या कृतीचा विचार अस्तित्ववाद न पाहताच होऊ शकतो काय ? अस्तित्ववाद हा एक वाङ्मयीन संप्रदाय आहे तसाच वास्तव, स्वच्छंद, अभिजात व विदग्धही आहे. ह्याचप्रमाणे संत, आर्ष, अभिजात व लोक (Folk) हे देखील मराठी वाङ्मयातील संप्रदाय आहेत. ह्या विविध संप्रदायांचे उद्भव, आविर्भाव व त्यांचे परस्परांशी असलेले नाते हे वाङ्मयेतिहासातील प्रधान प्रमेय असते. ■

ए १८, विद्यापीठ प्राध्यापक निवास
अमरावती रोड, नागपूर

साभार पोच

हजारी बेलपानं / प्रतिमा इंगोले / समाज प्रबोधन संस्था, पुणे / रु. ५ /– पृ. ६८
अक्सदीचे दाने / प्रतिमा इंगोले / मराठवाडा पब्लिशिंग हाऊस, औरंगाबाद / रु. २० /– पृ.७६
संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज /संपा. प्रा. भगवान काळे /संकेत प्रकाशन, जालना /रु.१००/–पृ.११४
जय पराजय / जयश्री रुईकर / हीरक प्रकाशन; नागपूर / रु. ३२ /– पृ. ११६
वनवास / अमर वझलवार व अनिरुद्ध वझलवार / हीरक प्रकाशन, नागपूर / रु. १० /– पृ. ४२
आत्मवेलीची फुले / उद्धव आठल्ये / हीरक प्रकाशन, नागपूर / रु. १० /– पृ. ४२
वॅम्बी / वसंत निगवेकर / हीरक प्रकाशन, नागपूर / रु. १० /– पृ. ५७
नादप्रतिभा / प्रतिभा नारायण / हीरक प्रकाशन, नागपूर / रु. १४ /– पृ. ५६
युगावतार / प्र. ग. सहस्रबुद्धे / हीरक प्रकाशन, नागपूर / रु. ७५ /– पृ. २१८
सिझफायर / कॅस्केड / सुप्रिया प्रकाशन, मुंबई / रु. १२ /– पृ. ५८
महामानव डॉ. आंबेडकर / संपादन श्रद्धांजली / चेतश्री प्रकाशन, अमळनेर / रु. ५/– पृ. २९
पहाटतारे / दादा धर्माधिकारी / चेतश्री प्रकाशन, अमळनेर / रु. ५० /– पृ. १८५
कुंकवाचं देणंघेणं / सौ. जयश्री खरोटे / चेतश्री प्रकाशन, अमळनेर / रु. २५ /– पृ. ६८
आमचे राष्ट्रगुरु / गो. नी दांडेकर / गोकुळ मासिक प्रकाशन, पुणे / रु. १८ /– पृ. ७६
दत्तभार्गव संवाद त्रिपुरारहस्य–ज्ञानखंड / बाबा सागडे / ना मो. सागडे, डोंबिवली / रु. ७५ /– पृ. ३३७
देशाचे वाटोळे करणारी हिंदूंची रोगट वृत्ती / रमेश रघूवंशी / रघूवंशी प्रकाशन, मुंबई / रु. ३६/– पृ. १८८
गो.नी.दांच्या प्रादेशिक कादंबऱ्या / डॉ. दादा गोरे / सुवर्णलता मारवाडे, औरंगाबाद / रु. ३०/–पृ.९४
अक्षर / सुहासिनी इर्लेकर / धारा प्रकाशन, औरंगाबाद / रु. २० /– पृ. ६६
मागे वळून / मथुताई आठल्ये / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. ३५ /– पृ. ११२
माणूस शेती आणि पाणी / बापू उपाध्ये / श्रीविद्या प्रकाशन पुणे / रु. ६० /– पृ. २१२
सांगण्याजोगे / डॉ. शांताबाई गुलाबचंद / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. ६० /– पृ. १७१
बारामाशा / शरणकुमार लिंबाळे / श्रीविद्या प्रकाशन; पुणे / रु. ३०/– पृ. ९९
बदलते जीवन / इंदुमती सुखात्मे / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. ४५/– पृ. १६२
डॉ. आंबेडकरांचा सांगाती / बळवंत हणमंतराव वराळे / श्रीविद्या प्रकाशन पुणे / रु. ७०/– पृ. २७८
गोर्वोचोवपर्व / नरेंद्र सिदकर / श्रीविद्या प्रकाशन पुणे / रु. ४०/– पृ. १२३
स्त्रीसूक्त / अश्विनी धोंगडे / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. २७–५० / पृ. ७३

क वि ता

[कै. दे. शि. दुधलकर या वैदर्भीय कवीची 'युगवाणी'कडे आलेली मृत्यूपूर्वीची ही शेवटची कविता, श्रद्धांजली आणि स्मरणाच्या निमित्ताने प्रकाशित करीत आहोत.]

स्वप्ने / दे. शि. दुधलकर

माणसाला जग कळू लागलं की त्याला स्वप्ने पडू लागतात
स्वप्नांचा दर्जा असतो माणसांच्या दर्जाप्रमाणे
काहीकांची स्वप्ने असतात सप्तरंगी
तर काहीकांच्या स्वप्नांना रंगच नसतो
चालायला जशी असावी लागते पायाखाली मळलेली वाट
तशी स्वप्नांनाही पाहिजे असते धनिकांची ऐश्वर्यसंपन्न भूमी
तात्पर्य हे की—
ज्याच्या पोटातला दाह विझलेला असतो
त्यांनाच स्वप्ने पडतात नानाप्रकारची, तरंगणारी, उडणारी, पळणारी
ते जगतात खोवूनच स्वप्नांची पिसं
कारण त्यांना दुसरे काही करायचेच नसते
क्षणाक्षणाला नवे स्वप्न पाहायचे असते
इथे तर पोटाच्या विवंचनेतच
रात्रीचा दिवस आणि दिवसाची रात्र होते
एकेक स्वप्न बघता बघताच जिंदगी गहाळ होते
भिकाऱ्यांनी पाहू नये स्वप्ने, करू नये इच्छा
धावू नये क्षितिजाच्या लोभाने
पायाखाली जेवढी मिळाली जमीन
तेवढ्यावरच जगत राहावे डोळे बांधून
(हा इथला अलिखित नियम आहे)
गरिबांची स्वप्ने नित्याचीच वांझोटी असतात
पाहिली तर पळून जातात
वेड्यासारखे कुणी धावलेच स्वप्नांच्या मागे
तर ते धावता धावताच मरून जातात
आणि मग तेच स्वप्नात जमा होतात

□ □

दोन कवडसे / सुलभा हेर्लेकर

तलावातल्या गच्च पाण्यात
फांदीवरचा पक्षी
स्वतःलाच बघतो, तेव्हा
फांदीचे रूपही किती
मोहक होऊन जाते...

बांधावरून कडेकडेने जाताना
तलावाच्या पाण्यात बुडालेली
आत्ममग्न झाडं, तू मला
कवितेसाठी बहाल केलीस
पण बहर उडालेल्या या
फांद्यांचा आकांत...माझ्याच
देहात झिरपत जातो...
शब्दांचे काय विचारतोस ?

□ □

काहीच कळेना आता / श्रीकृष्ण बेडेकर

प्रतिबिंब तुझे या डोळा शतदा जडते आहे
दुःखाचे झाड नव्याने हेलावून रडते आहे ॥१॥

चंद्राचा डंख मिटेना जगण्याचा मोह सुटेना
प्रणयाची रीत अशी ही देहाला नडते आहे ॥२॥

वळते रे वाट कशाला भलत्या सलत्या गावी
कोडे हे खिन्न हवेला अजुनी पडते आहे ॥३॥

कधीही येता जाता तू भेट गडे स्वप्नाला
ते इंद्रधनु शब्दांचे मौनातच दडते आहे ॥४॥


रक्ताचे झाले पाणी तरीही फुलती गाणी
काहीच कळेना आता का हे घडते आहे ॥५॥

□ □

सघन सूर / सुलभा हेर्लेकर

अतीव तीव्र काळोखाच्या वेळीही
माझी मीच असते एकटी अंतर्बाह्य
डोळ्यांना दिसतो तो एक पारदर्शी पदर
ज्याच्या पल्याड डोकावले की सारी
सृष्टी होऊन जाते सजल सुंदर.
खोडसाळ पावसाचे धन्वंतरी रिमझिमणे
हलकेच चांदण्यातून डोकावणारे झाडांचे गाणे...
पण या सघन सुरांना फार काळ
बांधून ठेवता येत नाही.
वाऱ्याच्या कसलेल्या कवायतींनी
एकदा का पानगळ सुरू झाली की सगळेच
रंगसूर एक होऊन जातात...
ते कुठल्या झाडाचे ? कुठल्या भूमीवरचे ?
काहीच कळत नाही.
पण भर रात्रीत एकांतात उधाणलेली
लाख फुलं वाऱ्यावर उडवून उध्वस्त
झालेल्या पाकळ्यांचे रंग, त्याने मला
बहाल केले असतात... कायमचे.

□ □



सहा उर्दू कविता / खालिद आगासकर
अनुवाद : मनोहर

१. पैज

पत्त्याच्या गड्डीतून
पहिलं पान
असं घसरलं
जसं माझ्या हातातून
माझं बालपण
निसटून गेलं.

पहिलं पान
बदामचा एक्का
रंग मेंदीसारखा.

दुसरं पान
" जोकर "
दुसऱ्याला सर्वस्व देऊन
स्वतःचं महत्त्व हरवून बसतो
निराशेच्या गर्तेत.

तिसरं पान
स्वतःच्या पैजेचं
अंतिम आधार
ओढायला गेलो
पण हस्तस्पर्श होताच
ते काळं झालं.

□ □

२. दोन डाग

पानं
पांढरी, निळी, काळी, पिवळी
पानं
काळ्या रेघांचं जाळं
रेघा
वाकड्या तिकड्या
अपूर्ण, अस्पष्ट


शाईचे दोन डाग
खूप काळ पहात राहिलो
शाई पसरत गेली
आकुंचन पावत गेली
चिडून ते
खराने मिटवायला गेलो
तर
सगळी पानंच फाटून गेली.


□ □

३. साक्षात्कार

मी
आपल्या आईच्या
गर्भाशयात बसून
विचार करतोय
किती बरे झाले असते
केला असता आईने गर्भपात.

□ □





४. पाठलाग

मृत्यू
सावलीसारखा
माझा पाठलाग करतोय
आणि मी
काळोखात उभा
आपल्या बुद्धिमत्तेचा
अभिमान जोपासतोय्.
□ □

५. मन

घराची
सर्व दारे-खिडक्या बंद केल्यावर
मला वाटले
दिसणार नाहीत जगात चाललेले हंगाम
पण
माझे मन
जगाच्या पलिकडचेच पहात होते.
□ □

६. ओळख

वयाच्या पंचविशीपर्यंत
जगाला समजून घेण्याच्या प्रयत्नात
माझा अभ्यास, आत्मविश्वास
निष्फळ ठरला
अखेर
स्वतःला समजून घेण्याच्या प्रयत्नाला लागलो
तेव्हा कुठे
मला जगाची खरी ओळख व्हायला लागली.
□ □

वळसा / वासन्ती इनामदार जोशी

केवढ्या लांबून वळसा घालून आले
आपल्या भेटीसाठी अगदी आतुरतेने,
आपल्या खाणाखुणा शोधित शोधित
कुणा कुणाला विचारित विचारित
हे दुःख...लांबून वळसा घालून आले.
दुःखाचा हा मेणा
अगदी पेशवाई थाटाचा !
...सुखांच्या भोयांना परतण्याची घाई आहे.
या मेण्याला सामोरे जाऊया
तू सनई चालू कर
मी तबला घेऊन येते.
हो ना...केवढ्या लांबून वळसा घेऊन आले.
□ □

चित्र / विलास कणेकर

चित्र रंगवायला घेतले तेव्हा,
रंगपेटीतील सगळे रंग
कसे छैल छबिले ताजे होते—
चित्र पुरे झाले.
तोपर्यंत कसे लक्षात आले नाही !
चित्रातल्या आपल्या झाडाला
पाने फुले आलीच नाहीत ते !

□ □

तात्पर्य / मनोहर सप्रे

१
लोकशाहीवर तुमची श्रद्धा असली पाहिजे
स्वागतग्रस्त पुढारी सांगत होते
आणि तेच—
त्यांनी नेमलेले शाळामास्तर जीर्ण आवाजात
व करड्या आवाजात पोलीस सांगत होते.

२
लोकसभा सार्वभौम आहे
ती म्हणे कांहीही करू शकते.
कायदा पास करून सर्व लोकांना
दारिद्र्यमुक्त करू शकते.
तसा-कायदा झालाही आहे
म्हणूनच आज—
भीक मागणे कायद्याने गुन्हा आहे.

३
लोक दुःखात आहेत हे खोटे आहे
कारण
सुखाची आकडेवारी उपलब्ध आहे
आकडेवारीचे पुस्तक भिकाऱ्यालाही परवडेल
इतके स्वस्त.
मागवा—पब्लिकेशन डिव्हीजन.
तात्पर्य—
तुम्ही सगळे सुखी आहात
म्हणून—
पुढारीही.

□ □

हिरवं स्मित / रवींद्र पांढरे

एक क्षण
आभाळातलं धुकं
दवाच्या थेंबाथेंबात
पानापानावर सांडलं.
दु
स
रा
क्ष
ण
सूर्याच्या सोन करांनी
अलगद उचलुन घेतलं
आभाळातलं धुकं
आभाळात विरलं
खाली काय उरलं ?
पानापानातून ओसंडणारं
हिरवं स्मित.

□ □

म्हणजेच... / राहुल मेश्राम

मी—तू तुम्ही—आम्ही
आपण सगळेच असतो कुठे ना कुठे
स्वतःशीच प्रतारणा करत
आयुष्याच्या अर्थाची करत असतो
गंभीर व भावविव्हळ चर्चा
मुखशुद्धीसाठी
तसे तू—मी, तुम्ही—आम्ही, आपण
असतोच काहीसे असे की
नसतोच कशात असूनही
असून—नसून, नसताना असूनही
आपण आपले नसतो.
तसं नसतंच कुणीच कुणासाठीही
म्हणजेच...

□ □

चार पुस्तके

माधवी जुमडे

ग्रं थि की

हॅलो, चार्लस्

'हॅलो, चार्लस्' हे माधव गडकरी यांचे चार्लस् शोभराज या आंतरराष्ट्रीय गुन्हेगाराच्या जीवनावरील सत्य घटनेवर आधारित पहिलेच नाटक. वास्तविक माधव गडकरी महाराष्ट्राला परिचित आहेत ते एक पत्रकार म्हणून ! आणि म्हणूनच एका पत्रकार लेखकाच्या लेखणीतून साकार झालेली ललित कलाकृती म्हणून 'हॅलो, चार्लस्' कडे वाचकांचे लक्ष विशेषत्वाने वेधल्या जाते. एखादे काल्पनिक कथानक आपल्या पहिल्याच नाट्यनिर्मितीसाठी न शोधता एका आंतरराष्ट्रीय गुन्हेगाराच्या जीवनावरील सत्य घटना आपल्या नाट्यकृतीचा विषय लेखकाला का करावासा वाटला अशी शंका येते. आणि पाठोपाठच याचे उत्तर कदाचित गडकऱ्यांच्या पत्रकारी पेशात असावे असे वाटते. पत्रकार गडकऱ्यांचे व्यक्तिमत्व नाटकात म्हणूनच पदोपदी डोकावत असते.

चार्लस् शोभराज नावाच्या आंतरराष्ट्रीय गुन्हेगाराला आज भारतीयच नव्हे तर सारे जग ओळखते. एक खुनी, दरोडेखोर म्हणून त्याने जागतिक क्षेत्रात विलक्षण खळबळ निर्माण केली होती. चार्लस् चतुर होता. भारतीय लोकांची वृत्ती नेमकी हेरली होती. आणि त्याचाच फायदा घेऊन तो दोनदा तुरुंगातून पळाला होता. पण शेवटी त्याला पकडण्यात पोलीस अधिकाऱ्यांना यश मिळाले. आपल्या विलासी जीवनात त्याने कितीतरी तरुणींना अडकवले आणि शेवटी त्यांचे क्रूरपणे खूनही केलेत.

अशा या बेफाम, विलासी, आणि दरोडेखोर चार्लस्च्या जीवनावर नाट्यकृती निर्माण करण्याचा अभिनव प्रयत्न माधव गडकरी यांनी आपल्या पहिल्याच नाटकांत केलेला असून तो सफलही झालेला आहे. चार्लसच्या जीवनावर प्रकाश टाकतानाच दुसरीकडे राजकीय क्षेत्रात चालणारी फितुरी आणि त्यामुळे चार्लस्सारख्या गुन्हेगाराचे कसे साधते याचे टीकात्मक चित्रण आपल्या चटकदार आणि रूपकात्मक संवादातून परिणामकारकपणे रेखाटले आहे.

चार्लसच्या जीवनाबद्दलचा बराचसा इतिहास गडकऱ्यांनी निश्चितच चिकित्सकपणे अभ्यासाला आहे हे नाटक वाचल्यावर जाणवते. नाट्यकृतीचे तंत्र जरी त्यांना त्यांच्या मते ज्ञात नसले तरी अजाणता का होईना नाटकात काही प्रमाणात कसलेल्या नाट्यतंत्राची छाप आहे. चार्लस्चे व्यक्तिचित्रण अप्रतिम रेखाटल्या गेले आहे पण सोबत इतर पात्र चित्रणही कथानकाला अनुरूप आणि उठाव देणारे आहे.

या सर्व दृष्टीने 'हॅलो, चार्लस् !' सरस ठरले आहे हे निश्चित, पण शेवटी एका प्रासंगिक सत्य घटनेवरची ही नाट्यकृती असल्यामुळे त्याला मर्यादा पडलेली आहे. या कक्षेपलिकडे लेखकाला स्वतःची स्वतंत्र कल्पनाशक्तीची भरारी घ्यायला वाव नाही. अर्थात लेखकाने निवडलेला विषयच तसा साचेबंद सत्य घटनेवर आधारला असल्यामुळे ती मर्यादा लेखकाला पत्करावीच लागते. तरीही पहिलेच नाटक असूनही चटकदार संवाद, कुतूहल आणि उत्सुकता ताणून धरणारे रहस्य आणि खिळवून ठेवणारा संघर्ष अशा विविध वाङ्मयगुणांमुळे 'हॅलो, चार्लस् !' ही एक उत्कृष्ट नाट्यकृती ठरलेली आहे.

■

ती एक रानफूल

मानवी जीवन म्हणजे ऊन सावल्यांचा लपंडावाचा खेळ ! त्यातही सुखाच्या तुलनेने दुःखच अधिक ! माणसाच्या मनातल्या कधीकधी अशा अमूर्त व्यथा असतात की त्या व्यक्त करायला शब्द तोकडे पडू लागतात अशाच काही अव्यक्त

मनोव्यथांची प्रेम आणि कर्तव्य अशा संघर्षाची आणि मानवी मनाच्या विविध पैलूंची यथोचित शब्दातून उत्कटपणे उकल करून देणारी एक उल्लेखनीय कलाकृती म्हणजे शांता वैद्य यांचा रूपांतरित कथासंग्रह 'ती एक रानफूले' असे म्हटले तर अतिशयक्तीचे ठरणार नाही. जागतिक रंगभूमीवर जी काही नाटके साहित्यदृष्ट्या कलात्मकदृष्टचा अजरामर ठरलीत त्यातल्या काही नाटचकृतीचे रूपांतर शांता वैद्य यांनी 'ती एक रानफूल'मध्ये समर्थपणे केलेले आहे.

परकीय भाषेतील उत्कृष्ट वाङ्मयाचे वाङ्मयीन आकलन सुलभ व्हावे हा एक रूपांतरित साहित्य नर्मितीचा उद्देश असतो. त्या दृष्टीने कथा संग्रहाचा उद्देश सफल झाला आहे असे म्हणायला हरकत नाही. कथासंग्रहातल्या कथा मानवी मनोवृत्तीचे विविध पैलूंची दखल घेतात. 'ती एक रानफूल'मधल्या प्रियेची व्यथा उलगडून दाखवताना एकीकडे–प्रेम आणि दुसरीकडे कर्तव्य अशा संघर्षात सापडलेली शीमेन आणि तिच्या मनातले द्वंद्व व्यक्त करतांना तसेच मातृत्वासाठी शरणागती पत्करून आपल्या पतीची आपल्या डोळयादेखत निर्घृण हत्या करणाऱ्या शत्रू पुरुषा-सोबत विवाह करायला सिद्ध झालेले आन्द्रोमा-कच्या मातृमनाची घालमेल टिपतांना लेखिकेने त्या नायिकांच्या अंतर्मनाचा तळ गाठल्यासारखा वाटतो. एखाद्या अर्धोन्मीलित कळीने अलगद उमलावे तितक्या हळुवारपणे प्रसंगाची उकल लेखिकेने केलेली आहे. 'कोरी पाटी' ही एक आघाडीवर जखमी झाल्यामुळे स्मृती हरवलेल्या तरुणाची कथा, तर बुवाबाजीवर आधारित काहीशी वोदाकडे झुकणारी कथा म्हणजे 'स्वामी अभयानंद !' दोन्ही कथाविषय फारसे अपरिचित नसले तरी लेखिकेच्या स्वतःच्या प्रतिभेमुळे आणि वाङ्मयीन आत्मभान यामुळे कथा वाचनीय झालेल्या आहेत.

'ती एक रानफूल' हा रूपांतरित कथासंग्रह. ती लेखिकेची स्वतःची निर्मिती नाही. पण नाटच कृतींना कथानकात रूपांतरित करीत असतान. कथानकातील वाङ्मयीन सौंदर्याला धक्काही लागू दिला नाही तर आपल्या भावस्पर्शी समृद्ध शब्द-सुमनांना आपल्या तरल अनुभूतीतून एखाद्या शांत सुंदर झन्यासारखं वाहवत ठेवून कथासंग्रहाचे वाङ्मयीन सौंदर्य समृद्ध केलेले आहे.

एका वेगळ्या साहित्यप्रकाराला हात घालून लेखिकेने एका नवीन साहित्यप्रकाराच पायंडा मराठी साहित्याला घालून दिला आहे. आणि 'ती एक रानफूल' त्यामुळेच वाचकांच्या मनः-पटलावर नेहमीच स्वामित्व गाजवीत राहील.

■

'ती एक रानफूल'
ले. शांता वैद्य
प्रकाशिका : सौ. यशोदा सोनार
चेतश्री प्रकाशन, देशमुख चाळ
अमळनेर ४२५४०१ जि. जळगाव
पृष्ठ संख्या : १६७
मूल्य : पन्नास रुपये

महापूर

गेल्या काही वर्षात मराठी साहित्याला एक नवीन आणि वेगळी वाङ्मयाची खाण सापडली आहे. आणि ती म्हणजे वैदर्भीय साहित्यिकांनी निर्माण केलेले वऱ्हाडी साहित्य ! आपल्या भाषा वैशिष्टचाने आपले एक स्वतंत्र स्थान निर्माण करणाऱ्या वऱ्हाडी साहित्याने एक नवीन दालन मराठी रसिक वाचकांपुढे उघडून दिलं असून मराठी वाचकांनी त्याचे उत्स्फूर्तपणे स्वागतही केलेले आहे. आणि दिवसेंदिवस त्याची आगेकूच सुरूच आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे जयवंत काकडे यांची वऱ्हाडी भाषेतील ग्रामीण जीवनावर आधारित आटोपशीर कादंबरी 'महापूर !'

ताडगावसारख्या लहानशा खेडयात लोक सुखीसमाधानी जीवन जगत असतात. पण या अज्ञानी लोकांच्या स्थिर जीवनात खळबळ माजते ती सरकारच्या गावातील उमा नदीवर धरण बांधण्याच्या निर्धारामुळे ! लोकांच्या विरोधाला न जुमानता राजकीय लोकांच्या दडपणाखाली धरण बांधल्या जाते. पण अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचारामुळे धरणाचे बांधकाम कमकुवत होते. आणि दुर्दैवाने त्याच वर्षी झालेल्या प्रचंड

पर्जन्यवृष्टी मुळे घरण फुटून महापूर येतो. सर्वत्र जो हाहा:कार माजतो याचे मनोवेधक चित्रण 'महापूर'मध्ये जयवंत काकडे यांनी समर्थपणे केले आहे. आजही काही ठिकाणी ग्रामीण क्षेत्रात गरीब जनतेची पिळवणूक करणारी सावकार मंडळी असतात. त्यांचं प्रातिनिधिक स्वरूप म्हणजे कादंबरीतील अप्पा पाटील हे पात्र. या पात्राच्या माध्यमातून एका ज्वलन्त समस्येला जयवंत काकडे यांनी स्पर्श केला आहे.

ग्रामीण जीवनातले दैनंदिन प्रसंग लेखकाने सूक्ष्मपणे टिपलेले आहेत. त्यामुळे कादंबरीत कृत्रिमता जाणवत नाही. पण कादंबरीच्या सुरुवातीपासून कथानकाची जी घट्ट पकड आहे. ती अखेरीस मात्र सैल झाल्यासारखी वाटते. महापुरानंतर लोकांचे उध्वस्त झालेले जीवन हा एक हृदस्पर्शी प्रसंग. पण लेखकाला तो प्रसंग तितका भावस्पर्शी करण्यात अपयश आलेले आहे; आणि घाईत कादंबरीचा शेवट करण्याच्या मोहात एक मनोवेधक कादंबरी मागे एक उणीव ठेवून जाते. तेवढी एक उणीव सोडल्यास ग्रामीण जनजीवनाचे स्वानुभूतीतून जीवनदर्शन घडविणारी एक यशस्वी कादंबरी म्हणून 'महापुरा'कडे बघावे लागते. ■

महापूर
जयवंत काकडे
प्रकाशिका : सौ. सुचित्रा जयवंत काकडे
वरोरा, जि. चंद्रपूर
पृष्ठ संख्या ११५
मूल्य : वीस रुपये

आवजो

राष्ट्राराष्ट्रातले संबंध अधिक स्नेहाचे व बळकट व्हावेत यासाठी आजवर प्रत्येक प्रगत आणि शांतताप्रिय राष्ट्रांनी प्रयत्न केलेले आहेत. त्यासाठी त्या त्या देशाची संस्कृती, त्यांच्या रूढी, परंपरा, त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोण यांची जवळून ओळख करून घेणे आवश्यक असते. त्या दृष्टीने पद्मजा फाटक यांचा अमेरिकेमधील काही-काळच्या वास्तव्यातल्या अनुभवांनी साकार झालेला 'आवजो' हा लेखसंग्रह उल्लेखनीय आहे. पद्मजा फाटक या स्वत: एक सामाजिक कार्यकर्त्या आहेत. मुंबई दूरदर्शन मधून महाराष्ट्राला त्यांचा परिचयही झालेला आहे.

सव्हीसचे सभासदत्व मिळवून पद्मजाताई सव्हीस तर्फे अमेरिकेत गेल्या होत्या. तिथली अणूनगरी, भाईक आणि बील यांच्या रँचर्सला त्यांनी भेट दिली. तिथल्या अणूशास्त्रज्ञांशी भेट घेऊन त्यांच्याशी अणूबाँबविषयी चर्चा केली. अनेकांच्या मुलाखती घेतल्या. या निमित्ताने त्यांचे काही अमेरिकन कुटुंबांशी संबंध आले. त्यांच्या सहवासात राहून त्यांनी त्याच्या विवाहसंस्थेबद्दलच्या कल्पना त्यांचे वैयक्तिक व सामाजिक जीवन जवळून, पाहिले. त्याच्या स्त्रीमुक्तीविषयक कल्पना त्यांच्या सहवासात राहून जाणून घेतल्या आणि त्यांना आलेले अनुभव आणि त्यांना झालेली अमेरिकेची ओळख याचा परामर्श 'आवजो' ह्या लेखसंग्रहात साध्या सोप्या भाषेत सहज सुलभतेने केलेला आहे. आपल्याकडील दलितांची स्थिती, अस्पृश्यता ह्या प्रमाणे तिथेही काळे गोरे हा वर्णभेद कसा आहे हे लेखिकेने एका काळ्या वर्णाच्या कुटुंबात राहून प्रत्यक्ष अनुभवला, आणि आपले अनुभव टिपलेत.

हे सगळे अनुभव कथन करताना पद्मजाताईंनी निवेदन पद्धतीचा वापर कमी करून त्याला संवाद रूपाची जोड दिल्यामुळे संग्रहाला एक नाट्यमयता प्राप्त झाली आहे. संवादही घरगुती असल्यामुळे त्यात कुठेच कृत्रिमता जाणवत नाही. लेखिकेच्या लालित्यपूर्ण लेखनशैलीमुळे 'आवजो' सारखा ललितेतर लेखसंग्रह, कंटाळवाणा न वाटता वाचनीय झालेला आहे. आपल्याला आलेले अनुभव कथन करताना लेखिकेने आत्मप्रौढीचा मोह टाळला ही महत्त्वाची गोष्ट आहे. लालित्याचे अंग लेखिकेला आहेच. पण क्वचितच संग्रहात वापरलेली अलंकारिक भाषा वापरताना, त्यांना फारसे यश आलेले नाही. एवढी गौण बाब वगळता आपल्या अनुभवातून एका देशाचे सामाजिक राजकीय जीवनाचे पापुद्रे उलगडून

दाखवण्याचा लेखिकेचा प्रयत्न 'आवजो'मधून बराच यशस्वी झालेला आहेत यात शंका नाही. ■

आवजो
पद्मजा फाटक
प्रकाशक : दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार पेठ
पुणे ४११०३०
पृष्ठे : १८१
मूल्य : पन्नास रुपये

निवडक ना. सी. फडके

प्रमोद मुनघाटे

'निवडक ना. सी. फडके' हे पुस्तक साहित्य अकादेमीने प्रकाशित केले आहे. ना. सी. फडके यांनी हाताळलेल्या सर्वच वाङ्मय प्रकारातील निवडक साहित्याचे संपादन इंदिरा संत आणि प्रल्हाद वडेर यांनी केले आहे.

पद्मभूषण ना. सी. फडके हे नाव एकंदर आधुनिक मराठी साहित्यात 'मैलाचे दगड' समजले जाते. त्यांच्या अफाट साहित्यनिर्मितीत विविधताही आहे. चौऱ्याहत्तर कादंबऱ्या, एकतीस कथासंग्रह, बत्तीस लेखसंग्रह; पंधरा ललित गद्यांची पुस्तके, नऊ चरित्रे, नऊ नाटक नाटिका आणि एक आत्मचरित्र, इतक्या मोठ्या पसाऱ्यातून 'निवडक फडके' निवडणे तसे कठिणच काम. आणि त्यातही या प्रतिनिधिक साहित्यातून त्यांची वाङ्मयीन भूमिका आणि एकसंध व्यक्तिमत्व यांचा परिचय अ-मराठी वाचकांना करून देणे; ही मर्यादा. तरीही वरील संपादकद्वयांनी ही कामगिरी उत्कृष्टरीत्या पार पाडली आहे.

फडके हे मुख्यतः कादंबरीकार म्हणून प्रसिद्ध असले तरी समीक्षा, कथा आणि ललितगद्याच्या संदर्भात त्यांचे स्थान महत्त्वाचे आहे. एके काळी गाजलेले साहित्यविषयक महत्त्वाचे लेख या पुस्तकात निवडले आहेत. त्यावरून फडक्यांची कलावादी भूमिका स्पष्ट होते.

विविधता, आधुनिकता आणि अद्ययावतपणा ही त्यांच्या लौकिक जीवनाची, वाङ्मयीन व्यक्तिमत्वाची व कादंबऱ्यांचीही मुख्य वैशिष्टचे आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांचे विषय, रचना, कथानक यांचे अवलोकन करताना या वैशिष्टयांबरोबरच त्यांच्या कलाविलासामागील वैचारिक अधिष्ठानही वाचकांना जाणवते.

या पुस्तकात संग्रहित केलेल्या फडक्यांच्या कथा, त्यांच्या सर्वोत्कृष्ठ कथा आहेत. त्यांच्या चौकटबद्ध तंत्रावर बरी-वाईट टीका होऊनही आजही या कथा वाचनीय व आशयगर्भ वाटतात, ही फार महत्त्वाची गोष्ट आहे.

'वाचकाचा अनुभव समृद्ध करणे हे कादंबरीचे कार्य आहे.' असे मानणाऱ्या फडक्यांनी तत्त्वज्ञानापासून क्रिकेट, संतती नियमनापर्यंत विविध विषयावर त्यांनी मराठी व इंग्रजीतून लेखन केले आहे. या सर्वच साहित्याची चुणूक या पुस्तकात दाखविली आहे. फडक्यांच्या ललितलेखांची निवड मात्र तितकीशी योग्य वाटत नाही.

दोनशे पंचाहत्तर पृष्ठाच्या या पुस्तकाचा समारोप फडक्यांच्या 'माझं जीवन : एक कादंबरी' या आत्मचरित्राच्या समारोपाने केले आहे. बत्तीस हजार पृष्ठांचे लेखन करून मला काय मिळाले याचा उहापोह या अखेरच्या प्रकरणात फडक्यांनी केला आहे. 'अर्थलाभ आणि लौकिक हे साहित्याचे सर्वमान्य हेतू आहेत, ते मी गौणच समजतो. साहित्यनिर्मितीचा काही एक विशिष्ट स्वतंत्र आनंद आहे. तो मी हयातभर भरपूर घेतला आहे.' असे म्हणून जीवनाच्या अखेरीसही ते आपल्या आवडत्या 'वादाशी' इमान राखतात.

एकंदरीत फडक्यांच्या अवाढव्य साहित्याची थोडक्यात ओळख करून देण्यात इंदिरा संत व प्रल्हाद वडेर यांना बरेच यश आले आहे. ■

निवडक ना. सी. फडके
संपादक : इंदिरा संत / प्रल्हाद वडेर
साहित्य अकादेमी;
रवींद्र भवन, ३५, फिरोजशहा मार्ग
नवी दिल्ली १
प्रथमावृत्ती १९८७
मूल्य : रु. ४५

चार कवितासंग्रह

प्रमोद मुनघाटे

१. मॉस्कोतील कविता

'मॉस्को प्रवासाहून' आल्यानंतर लिहिलेल्या भावकवितांचा हा बापूराव जगतापांचा कवितासंग्रह. यातील सर्व कविता मॉस्को या शहराशी संबंधित आहेत. मॉस्को शहराने आपल्याला एक नवं अंतःकरण बहाल केलं असे कवीला वाटते. आणि या नव्या अंतःकरणाची स्पंदनं व्होल्गा नदी, लाल निशाण, लेनिन, क्रेमलिनची घंटा, ऑक्टोबर क्रांती, भारत–रशिया मैत्री अशा अनेक संदर्भात भावोत्कट काव्याचं रूप धारण करतात.

अतिशय सहज, ओघवत्या शब्दशैलीतील या कवितांना भारत–रशिया मैत्रीचा एकच एक संदर्भ असला तरी दोन्ही राष्ट्रांच्या सांस्कृतिक व जागतिक प्रश्नांचीही पार्श्वभूमी आहे. एक रशियन तरुणी कवीला 'मी भारतात येऊ काय. भारतात मुक्त स्त्री होऊ काय ?' असा प्रश्न जेव्हा विचारते, तेव्हा कवी जे उत्तर देतो त्यावरून या कवीची जाणीव केवळ प्रचाराच्या सरधोपट पातळीवरील नसून अनेक सूक्ष्म कंगोरेयुक्त आहे हे स्पष्ट होते.

'मॉस्कोच्या' सर्वच कविता वाचनीय व मननीय आहेत.

'मॉस्कोतील कविता'
बापूराव जगताप
श्रीविद्या प्रकाशन
२५०, शनिवार, पुणे ३०
प्रथमावृत्ती १९८७
मूल्य : रु. २७–५०

२. प्रार्थना

–गेल्या दशकात आपल्या कवितांनी समकालीन मराठी साहित्याच्या क्षेत्रात ज्यांनी आपले स्थान पक्के केले अशा कवींपैकी फ. मुं. शिंदे हे एक आहेत. 'प्रार्थना' हा त्यांचा नवा कवितासंग्रह.

'प्रेमिकांच्या आत्महत्येस' या अर्पण पत्रिकेपासूनच शिंदे यांची अंतर्मुख करणारी शैली वाचकांना पानोपानी स्तंभित करीत जाते.

'हे माझंच
माझ्यावर आक्रमण
का हिरावून घ्यावं
माझं साहूणं कोणी !'

अशीच स्वतःच्या अस्तित्वाबद्दलची शंका आणि प्रश्न सतत या कवीच्या कवितात पिंगा घालताना दिसतात. दिवस–रात्र, जमीन–आकाश, जीवन–मरण अशा द्वंद्वांच्यामध्ये आंदोलित होणाऱ्या एक अदृश्य जाणिवेला स्पर्श करण्याचा प्रयत्न कवी सतत करताना दिसतो.

दुर्बोध प्रतिमांच्या जंजाळात फसलेल्या नव्या कवितांच्या घोळक्यात फ. मुं. शिंद्यांची रोख ठोक कविता दिलासा देऊन जाते.

प्रार्थना
फ. मुं. शिंदे
श्रीविद्या प्रकाशन
२५२, शनिवार, पुणे ३०
प्रथमावृत्ती, १९८७
मूल्य : २७–५०

३. रस्ते दुभंगत आहेत

चित्रकार म्हणून प्रसिद्ध असलेल्या भ. मा परसावळे यांचा 'रस्ते दुभंगत आहेत.' हा दुसरा कवितासंग्रह.

गेल्या काही वर्षात झालेल्या सांस्कृतिक स्थित्यंतरामागील संघर्षाची बीजे विद्रोही साहित्यात दिसतात. अर्थात विद्रोही जाणिवांच्या साहित्याचा प्रवाहही काही अंतरावर येऊन थांबला. त्याला पुन्हा समकालीन सामाजिक वास्तवाचे संदर्भ आहेत. या थांबलेल्या प्रवाहाच्या पुढची कविता अलिकडे दिसून येत आहे. भ. मा. परसावळे यांचा 'रस्ते दुभंगत आहेत' या कवितासंग्रहाचे अक्षांश–रेखांश वरीलप्रमाणे आहेत.

'आम्ही–' ही या संग्रहातील एकच कविता या कवीचे 'लोकेशन' करायला पुरेशी आहे.

'कागदावरच नाचत बसायचे असेल
तर कोण नको म्हणणार आहे ?

डोळ्यादेखत वाढताहेत भिंती कैदखान्याच्या
आम्ही साखळदंड सिलेक्ट करण्याच्या

स्वातंत्र्यात
स्वतःची प्रतवारी लावत आहोत.

तर आम्ही असे आखाडे नाकारून
काठावर अक्षरे चिवडण्यात रमलेले बहादूर
देखवेना डोळा म्हणून फार झाले तर
शोषितांच्या किंकाळयावर, कंकाळावर
एखादा हंगामी अभंग झाडणारे
नवीन नामाभिधानाने भरताना आम्ही गुपचुप
होतो बिन बंदूकीच्या कत्तलीने येथे 'ढाका'
होताना आम्ही गुपचुप होतो. (आम्ही)

कवीच्या मनातील समकालीनांविषयीचा विचार एका मर्यादेत महत्त्वाचा असला तरी उपरोधिक शैलीतील या कविता विद्रोही कवितेच्या संदर्भात लक्षणीय आहेत.

'रस्ते दुभंगत आहेत'
भ. मा. परसावळे
क्षांगाती प्रकाशन, नांदेड
प्रथमावृत्ती १९८६
मूल्य : रु. २५

४. 'अक्षर'

'अक्षर' हा सुहासिनी इर्लेकर यांचा कविता-संग्रह.

काव्यलेखनामागील प्रेरणा कोणत्या हा काहीसा संदिग्ध व गूढ प्रश्न असला तरी हौशी 'आत्म-तृप्ती 'साठी प्रकाशित होणाऱ्या कवितासंग्रहाची संख्या मराठीत बरीच आहे. 'अक्षर 'सारख्या संग्रहाने या संख्येत आणखीच भर पडते.

ऊंचावून ओसरणाऱ्या लाटांचे
काठ कधी तोलू नयेत,
गर्भगर्द रेशीम अंगांचे
स्पर्श कधी जोखू नयेत'

अशी निसर्गाविषयीची भारावलेपणाची काहीशी कौतुकाची, काहीशी कृतज्ञतेची भावना ही सर्वच कवितांची केंद्रेक आहेत.

लाटा, ढग, वाटा, डोळे, सखा, झाड, मुले, सुगंध अशा 'काव्यघटकांची' लयबद्ध ओळीमागून ओळींतील सुबक पखरण म्हणजे अक्षर मधील कविता.

'अक्षर'
सुहासिनी इर्लेकर
धारा प्रकाशन, औरंगाबाद
प्रथमावृत्ती १९८४
मूल्य रु. २०

स्त्री सूक्त

शीला कोलटकर

'स्त्री जन्मा ही तुझी कहाणी' ही उक्ती आजच्या 'स्त्री-मुक्ती'च्या जमान्यातही खरी ठरते. स्त्रीचे जीवन बदलले का ? तिचे जीवन बदलले असेलच तर कोणत्या स्वरूपात बदलले आहे ? ती खरंच मुक्त झाली का ?' असे सारे प्रश्न एका स्त्री-मनाला पडतात आणि त्यातूनच 'स्त्री-सूक्त' हा काव्यसंग्रह जन्मास येतो.

'स्त्री-सूक्त' या काव्यसंग्रहात शहरी जीवन व्यतीत करणाऱ्या स्त्रीची अनेकाविध रूपे कवयित्रीने रंगविली आहेत. तिच्या जीवनातील दुःखे, तिच्या व्यथा, तिच्या जीवनातील दुःखाच्या विविध छटा कवयित्रीने टिपलेल्या दिसतात. आज २० व्या शतकात वावरतानाही स्त्रीच्या जीवन-मानात कितपत फरक पडला आहे ? या प्रश्नाचे उत्तर 'दिन-विशेष', 'शंभर वर्षे', 'तळयात मळयात', 'काल आणि आज' या आणि अशा किती तरी कवितांतून आपल्याला सापडते. 'बातम्या' या कवितेतील या ओळी पहा-

'सन लिहिताना ती कधी लिहिते १८८८
शतकाची चूक बदलावी असे
तिला कधी वाटत नाही.'

स्वतःचे 'स्वत्व' हरवून बसलेली ही गृहिणी कवयित्रीच्या मनाला सतत बोचते आहे. ही व्यथा अनेक कवितामधून समर्थपणे व्यक्त झालेली दिसते.' बिनचेहऱ्याची ', बायको ', 'संध्याकाळ ', 'शंभर वर्षे' या कवितांमधून स्वतःलाच ओळखू न शकणारी, संसारात गुंतत जाताना स्वतःचे व्यक्तिमत्त्व विसरत जाणारी ही स्त्री चित्रित

होताना कवयित्री जे प्रश्न विचारते तेही मार्मिक आहेत. 'तू कोण ?' याचा शेवट—

'तू कोण बाई ?
माझे मलाच ठाऊक नाही'

किंवा 'ती एक मिनी कॉम्प्युटर' यातील

'ती कुठं राहते हो ?
ती ना ? हरवून गेली.'

हे प्रश्न शेवटी स्त्री-व्यथाच व्यक्त करतात.

स्त्री जे शहरी जीवन जगत आहे त्या जगण्यातील कृत्रिमता कवयित्रीच्या डोळ्यांनी टिपली आहे व त्याचे अनेक पदर तिने वेगवेगळ्या कवितांमधून व्यक्त केले आहेत. 'कॅक्टस्'. 'बॉन्साय', 'फ्लॅटमध्ये', 'स्टॅन्डर्ड' या कवितातून त्या कृत्रिमतेचा फोलपणा कवयित्री नवीन प्रतिमा घेऊन व्यक्त करते. या कवितांची शीर्षकच बोलकी आहेत.

शहरी जीवनातील एक अपरिहार्य भाग म्हणून बनत असलेला विशेष म्हणजे स्त्री नोकरीसाठी घराबाहेर पडली. नोकरीवरून घरी आल्यावर मात्र तिला घर सांभाळावेच लागते कारण शेवटी ती बाईच आहे. ह्या दुःखाबरोबरच नोकरी सांभाळण्यासाठी दिलेले 'स्त्री'त्वाचे मोल 'रोम ऑन हर' सारख्या अगदी छोट्याशा कवितेतून प्रभावीपणे व्यक्त होते. शेवटी स्त्री मुक्त कशी झाली ? याचेही चित्रण करताना कवयित्रीने जो उपहास वापरला आहे तो लक्षणीय ठरतो. 'स्त्रीमुक्ती', 'शंभर वर्षे', 'प्रसिद्धी', 'तळ्यात मळ्यात' या कविता या दृष्टीने वाचनीय होत.

स्त्री ही अजून उपभोग्य वस्तूच आहे. ती तिच्या पतीची दासी म्हणूनच ओळखली जाते हे जसे 'बलात्कार', 'सुखी संसार' या कवितांमधून व्यक्त होते तसेच स्त्रीला जी कवडीमोलाची किंमत आजही आहे तिचे यथार्थ चित्रण 'स्त्री', 'स्वस्त', 'यंत्र', 'छोट्या जाहिराती' यातून होते. स्त्रीवरील अत्याचार व तिचे नगण्यत्व व्यक्त करताना ओळी येतात—

'प्रत्यक्षातील स्त्री फार स्वस्त असते
हुंडाबळी घेणाऱ्याला
दुसऱ्या लग्नाची काळजी नसते'

वार्धक्यात नकोशी झालेली, आधारासाठी मुलांवर अवलंबून असलेली, दिवसभर घड्याळाच्या काट्याप्रमाणे फिरत असलेली आणि या साऱ्यात स्वतःचे व्यक्तिमत्त्व विसरलेल्या स्त्रीची विविध रूपे कवयित्रीने चित्रित केली आहेत.

पण कवयित्रीला अशा स्त्री-व्यक्तिमत्वाची अपेक्षाच नाही. तिला 'रूपकंवर'ची व्यथा कळते, तिला 'बातमी'तून व्यक्त होणारे स्त्रीवरील अत्याचार बोचतात आणि म्हणूनच तिला अपेक्षित असलेली स्त्री रंगविताना कवयित्रीची लेखणी अधिक अर्थगर्भ होते. 'विमुक्ता', 'दिल्या घरी तू', 'एकदा तरी', 'ओळख', 'स्वतःसाठी' या कविता या दृष्टीने वाचनीय होत.

उद्याची स्त्री कशी असावी, कशी असू नये स्त्री—बद्दलचे योग्य अयोग्य व्यक्त करणारा हा काव्यसंग्रह आहे आणि म्हणूनच 'स्त्री—सूक्त' हे काव्यसंग्रहाचे शीर्षकही अन्वर्थक ठरते.

या काव्यसंग्रहातील बहुतेक कविता छोट्याशा पण अन्वर्थक शीर्षके असलेल्या आहेत. इंग्रजी शब्द वापरण्याची कवयित्रीची लकब जाणवते. नर्म उपहास, उपरोध हा यातील बऱ्याचशा कवितांचा विशेष ठरतो. काव्यसंग्रहाच्या, सुरुवातीला वागांभृणी ऋग्वेदातील उद्धृत केलेल्या वचनावरून कवयित्रीची या संग्रहापाठीमागील भूमिका व्यक्त होते.

या काव्यसंग्रहातील स्त्री—जीवनाला मर्यादा असल्याचे जाणवते. कारण यातील स्त्री—जीवन शहरातील व तेही पुण्या—मुंबईकडील शहरी जीवनाचे चित्रण करते. त्यामुळे त्या अनुभवविश्वातील दुःखाचे, व्यथांचे चित्रण होताना काही काही कल्पनांची पुनरावृत्ती होताना दिसते. तर 'यादी'-सारख्या कवितेत फारसे नावीन्य दिसत नाही.

पण असे असले तरी त्या अनुभव विश्वातील अनेक वारकावे कवयित्रीने टिपले आहेत आणि त्यामुळेच स्त्रीच्या समाजातील स्थानाबद्दल परत विचार करायला लावण्यात हा काव्यसंग्रह यशस्वी झाला आहे असे म्हणावेसे वाटते. ■

'स्त्री सूक्त'—अश्विनी धोंगडे
श्री विद्या प्रकाशन, पुणे
पृ. ७३, रु. २७-५०

मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप १९५०–७५

म. रा. जोशी

कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाने पॉप्युलर प्रकाशन संस्थेच्या सहकार्याने १९५० ते १९७५ या कालखंडातील "मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप" असा एक परिसंवाद योजला. त्यामधील झालेल्या चर्चेचा वृत्तांत व लेखांचे संकलन प्रस्तुत पुस्तकात केले आहे. कादंबरी, कविता, नाटक, एकांकिका, कथा, आत्मचरित्र, ललित गद्य हे आजचे मराठी वाङ्मयप्रकार परिसंवादासाठी अभ्यासकांनी निवडले होते. तसेच विनोदी वाङ्मय, लघुनियतकालिके, दलित वाङ्मय, समीक्षा व मराठी वाङ्मयावरील परकीय प्रभाव हेही विषय परिसंवादासाठी होते.

प्रारंभी उद्‌घाटक गं. बा. सरदार यांनी आपल्या नेहमीच्या पद्धतीने भाषण दिल्यावर समारोपाचे भाषण गो. म. कुलकर्णी यांनी दिले. सरदार व गो. म. कुलकर्णी यांची भाषणे पाहिली असता दोघांच्या दोन तऱ्हा स्पष्टपणे दिसतात. १९५० साली भारताची घटना अस्तित्वात येऊन एका 'नवभारत वर्षा'चा जन्म झाला असा (गैरसमज) जो कित्येकांचा आहे त्याचा प्रभाव येथेही आहे. म्हणूनच की काय १९५०–७५ असा कालखंड निवडला गेला. १९५० साली ज्या काही घटनांना प्रारंभ झाला त्यापैकी 'साहित्य अकादमी'ची स्थापना ही एक महत्त्वपूर्ण घटना होती. या समितीने 'भारतीय वाङ्मयोदधि'ची महत्त्वपूर्ण (Ocean of Indian Literature) संकल्पना प्रथमतः सर्वच भारतीय साहित्य प्रेमीजनांसमोर सादर केली. पण दुर्दैव असे की, नेमक्या या महत्त्वपूर्ण विचारांचे विस्मरण प्रस्तुत परिसंवादांत भाग घेणाऱ्या सर्वांना झाले आहे, भारतीय साहित्य उदधिचे स्वरूप व भव्य पार्श्वभूमी लक्षात घेण्या-ऐवजी अमेरिकेकडून उसनी घेतलेली समकालीन साहित्याची (Contemporary Literature) कल्पना उराशी बाळगून १९५०–७५ कालखंडातील मराठी साहित्याचा विचार व तोही सर्वांगीण विचार जेव्हा होऊ लागतो तेव्हा जो तो स्वतः-पुरते स्वतःचे वर्तुळ कसे निर्माण करतो याची यथार्थ कल्पना येण्यास प्रस्तुत पुस्तक नितांत उपयोगी ठरते.

वस्तुतः जेव्हा केव्हा कोणत्याही साहित्याच्या प्रेरणा व स्वरूप अभ्यासल्या जातात तेव्हा केवळ आशय व अभिव्यक्तीचा विचार होत असतो. त्याच बरोबर, साहित्याच्या प्रेरणा व त्याचे स्वरूप, ज्या वाङ्मयीन संप्रदायाशी त्यांच्या जन्मसिद्ध गुणधर्मांनी संबंधित असते, त्या वाङ्मयीन संप्रदायाचाही परामर्श अभिप्रेत असतो. १९५० नंतर मराठी साहित्यात जो वाङ्मयीन संप्रदाय निर्माण झाला तोच सर्वंकष आहे काय ? किंबहुना १९५०–७५ च्या दरम्यान निर्माण झालेल्या साहित्याचा तेवढा मात्र विचार करून साहित्यक्षेत्रा-पुरत्या आपल्या धारणा ह्याच खऱ्या व त्रिकाला-बाधित आहेत हा नेमाडे प्रभृतींचा दर्पयुक्त उग्र आग्रह कितपत सयुक्तिक आहे, असा प्रश्न कोणाच्याही मनात उद्भवतो.

तसे पाहिले तर अस्तित्व व अतिवास्तव हे दोनही वाङ्मयीन संप्रदाय १९५०–७५ मध्ये मर्यादित अर्थाने सक्रीय झालेले आहेत. पण हे दोन्हीही संप्रदाय उसने व परकीय आहेत. त्यांच्या आधाराने केलेले कोणत्याही ग्रंथकाराचे संस्थापन व मूल्यांकन मर्यादित, त्रुटीत व सदोष राहते. तथापि १९५०–७५ दरम्यानच्या साहित्य निर्मितीचे स्वरुप दुसरे तिसरे कोणतेही नसून पूर्वीच वारंवार चर्चिल्या गेलेल्या कलावाद व जीवनवादाचे प्रगटीकरण असे गो. म. कुलकर्णी म्हणतात तेव्हा ते देखील १९५०–७५ कालखंडातील समकालीन साहित्य हे नवीन नसून जुनेच आहे असे ध्वनित करतात. पण त्याचबरोबर कलावाद व जीवनवादामधील द्वंद्व स्वच्छंदप्रमाणे वास्तव व अस्तित्ववादी वाङ्मयीन संप्रदाय जोपासतात असेही अप्रत्यक्षरीत्या सूचित करून मराठी 'समकालीन' साहित्याची संकल्पनाच फेटाळून लावतात. द्वंद्वात्मक साहित्य कला व जीवनवादाच्या आश्रयाने निर्माण झाले व आजही ते जरा वेगळ्या पद्धतीने प्रगट होत आहे हा

परिसंवाद समारोपकर्त्यांचा निष्कर्ष विवाद्य व चिन्त्य ठरल्यास नवल नाही.

तथापि ह्या परिसंवादाच्या निमित्ताने कविता, कादंबरी, कथा, आत्मचरित्र, ललितगद्य, नाटक, एकांकिका, इत्यादि वाङ्मयप्रकारांवर अभ्यासपूर्ण जे निबंध सादर झाले ते फार महत्त्वाचे आहेत.

वाङ्मय कोणतेही असो–प्राचीन, अर्वाचीन, आधुनिक वा समकालीन. ते तऱ्हेतऱ्हेचे वाङ्मय-प्रकार रूपानेच प्रगट होत असते. त्यांची चर्चा व अध्ययन नेहमीच उपयुक्त ठरते. परंतु येथेही चर्चाकारांनी वाङ्मय प्रकार 'समजून एकावेळी अनेक प्रकारची चर्चा केली आहे.

चित्रे, मिरजकर, वि. भा. देशपांडे, बांदिवडेकर, देसाई, जहागिरदार, द. भि. कुळकर्णी, गो. मा. पवार, कवठेकर; सर्व ह्या अभ्यासकांचे लेख परिसंवादाचा मूल गाभा ठरतो यांत संशय नाही. डॉ. रसाळ व हातकणंगलेकर ह्यांचे लेख तर परिसंवादाचे वैभव आहे. आत्मचरित्र, कथा इत्यादि वाङ्मयप्रकारांच्या निमित्ताने Type of Literature a form of Literature यांचे नाते अधिक स्पष्ट झाले असते तर फार उपयुक्त ठरले असते व 'घाट,' 'आकृतिबंध' व 'प्रकार' संज्ञांची चर्चा होऊन मराठी समीक्षेच्या शास्त्रशुद्ध परिभाषांचा मार्ग मोकळा झाला असता. ह्या दृष्टीने 'नेमाडे' यांनी वापरलेले शब्द मराठी साहित्याच्या प्रकृतिधर्माशी सर्वस्वी विपरीत व विसंगत आहेत.

मराठी साहित्याच्या प्रेरणा व स्वरूप पाहताना सर्वच समीक्षक अभ्यासक ह्या काळातील संत वाङ्मयाचा का विचार करीत नाहीत हे एक गूढ आहे. आजही संत वाङ्मय निर्माण होत आहे. बाबा महाराज आर्वीकरांचा ज्ञानेश्वरी दिव्यामृत-धारा ग्रंथ किंवा यासारखे ग्रंथ मराठीत आहेत. किंबहुना ज्याला अभ्यासक अर्वाचीन मराठी साहित्य नावाने संबोधतात त्या साहित्य लेखन कालात देखील गुलाबराव महाराज, गोंदवलेकर, स्वामी स्वरूपानंद, नाथनंगे महाराज (डव्हा); तुकडोजी महाराज, बाबा महाराज आर्वीकर इत्यादिकांनी विपुल वाङ्मयनिर्मिती करून देखील मराठी समीक्षक त्याकडे दुर्लक्ष करताना आढळ-तात हे एक नवलच आहे. संत वाङ्मय अर्वाचीन मराठीचा एक अविभाज्य अवयव आहे. त्याचा समावेश परिसंवादात झाला असता तर परिसंवा-दाची दिशाच बदलली असती.

प्रस्तुत परिसंवाद योजून डॉ. पवार, व डॉ. हातकणंगलेकर व शिवाजी विद्यापीठाने मोठेच कार्य केले आहे.

जवळपास सर्वच साहित्यिक भावडे असतात असा एक समज आहे. पण येथे मात्र परिसंवाद योजून (मराठीत बहुधा प्रथमच) प्रकाशकाने आपला भावडेपणा दाखविला आहे.

प्रस्तुत ग्रंथाबद्दल डॉ. पवार व डॉ. हातकणंगलेकर यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

■

मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप
(१९५०–१९७५) संपादक : गो. मा. पवार,
म. द. हातकणंगलेकर, पॉप्युलर प्रकाशन मुंबई
१ ली आवृत्ती १९८६; पृ. ४४२, रु. १५०/–

•••••युगवाणी प्रतिभेत भेद करणार नाही.
प्रतिभा जुनी–नवी अशी नसतेच.
अशा धारणांच्या लेखकांची युगवाणी त गरज आहे.

‘हायकू’च्या निमित्ताने

वाचकांचा पत्रव्यवहार

युगवाणीच्या जाने.–फेब्रु.–मार्च १९८८ च्या अंकात श्री. श्रीकांत गोंधळेकरांचा “हायकू”ला खरोखरच मराठीत फुलू देणार की... ? हा लेख वाचला. ह्या लेखात त्यांनी दिलेले संदर्भ मात्र वाचण्यात आले नाहीत. ह्याच अंकातील श्री. शैलेंद्र जाधवांच्या हायकू कविता व श्री. देविदास चौधरींची ‘एक हायकू’ ही कविता हे सारे वाचले. ‘हायकू’ हा प्रकार जपानमधून आपणाकडे कधी आला हे मला ठाऊक नाही. हा प्रकार खरोखरच जपानमधून आपणाकडे आला की तो आपणाकडेच निर्माण झाला ह्या बाबतीत माझ्या मनात शंका निर्माण झाली. ही शंका निर्माण होण्याची पार्श्वभूमी अशी –

३०–३२ वर्षांपूर्वी २–३ वर्षे वयाचा माझा भाचा आमच्या गावी येत असे. त्याचे गाव माहूर परिसरातले. विदर्भ मराठवाडा सरहद्दीवरचे; आडवळणाला असलेले आणि खेडेवजा. त्याला गाणं म्हणायला सांगितलं म्हणजे तो पुढील ओळी म्हणायचा–

सैंपाक केला, वाया गेला
थंडीची झोप काही लागेना
घोडयाची टाप काही वाजेना ।

तिचा ‘तो’ कुठेतरी दूर गेला आहे. ती त्याची प्रतीक्षा करीत आहे आणि त्या वेळची तिची आतुरता अत्यंत मोजक्या शब्दात वरील ओळींतून चित्रित करण्यात आली आहे. ह्या ओळींचा रचयिता कोण ते ठाऊक नाही. माझ्या भाच्याने ह्या ओळी आपल्या आईजवळून उचलल्या. त्याच्या आईनं – माझ्या – वहिणीनं ह्या ओळी कुठून उचलल्या हे तिला सांगता आलं नाही. ह्या ओळींना जोडून अजून काही ओळी आहेत की काय हेही तिला ठाऊक नाही. माझ्या भाच्याच्या गावी त्याच्या बालपणाच्या काळात म्हणजे ३०–३२ वर्षापूर्वी काव्य, साहित्य, वाङ्मयप्रकार ह्या गोष्टी जाऊन पोहोचल्याच नव्हत्या. तेव्हा माझा असा अंदाज आहे की ही रचना लोकगीता-सारखी कुण्या अज्ञात व्यक्तीची असावी. त्या व्यक्तीला ‘हायकू’ प्रकार त्या काळात ठाऊक नसावा. ही रचना हायकू प्रकारात चपखलपणे बसू शकेल अशी वाटते.

आणखी एक उदाहरण देतो. सुमारे ४५ वर्षांपूर्वीची गोष्ट. माझं गाव तेव्हा मोटार रस्त्यापासून बाजूला होतं. ते गाव म्हणजे एक मोठं खेडं– गावात जेमतेम सातव्या वर्गापर्यंतच्या शिक्षणाची सोय होती. साहित्य, साहित्यिक, साहित्य प्रकार त्या गावातल्या कुणालाही ठाऊक नव्हते.

आमचा एक लहानसा मळा होता. विहिरी-वर मोट चालायची. मोट हाकायचं काम उदेभान करीत असे. उदेभान पूर्णत: निरक्षर होता. तो बंजारी जातीचा होता. मोट हाकताना तो म्हणत असे–

चाल छोरी खेतमां गहू सोंगनेको
गहू की रोटी नरम लागो
गहू सोंगनेकी सरम लागो ?

वरील ओळीत मराठीतील, हिंदीतील व बंजारी बोलीतील शब्दांची खिचडी झालेली आहे. हे मुली (छोकरी, छोरी) शेतात गहू सोंगायला चल, गहू गव्हाची रोटी खायला कशी नरम लागते. मग; सोंगायची शरम वाटण्याचं काय कारण आहे ? ही रचना उदेभानची आहे की त्याच्याच सारख्या दुसऱ्या एखाद्या मोटकऱ्याची आहे ते निश्चितपणे सागता येत नाही. हाही प्रकार, माझ्या दृष्टीने, हायकूसारखाच आहे. ज्या भागात आणि ज्या काळात जपानी हायकू पोहोचला नव्हता तेव्हाच्या ह्या रचना आहेत. तेव्हा हायकू हा प्रकार जपा-नची मिरासदारी आहे असं समजण्याचं कारण

अनुक्रमणिका

नाही. अशा अजून कितीतरी रचना असतील. त्या प्रकाशात मात्र येऊ शकल्या नसाव्यात.

संशोधकांनी ह्या दिशेने संशोधन करावे ही अपेक्षा व त्यांना तशी नम्र सूचना.

ह. ग. पाटील
अकोला

२

'युगवाणी'च्या ऑक्टो. – नोव्हें. – डिसेंबर १९८७ च्या अंकात 'साहित्य : अध्यापन आणि प्रकार' या पुस्तकाचे श्री. म. रा. जोशींनी लिहिलेले तीन पानी परीक्षण आले आहे; त्यामधील सुमारे पाऊण पान वरील ग्रंथातील माझ्या लेखावर खर्च केले आहे. त्यावरील माझी प्रतिक्रिया पुढे देत आहे.

(१) समीक्षात्मक व कोणत्याही तात्त्विक विषयावरील लेखन गंभीर प्रकृतीचे असावे; लेखकाची भूमिका सत्यान्वेषण करणाऱ्या सहचिंतकाची असावी, सभेतील फड जिंकणाऱ्याची नसावी; कारण या चर्चेचे उद्दिष्ट सर्वांच्या सहकार्याने सत्य शोधणे हे असते. गंभीर लेखनाविषयीचे हे पथ्य प्रस्तुत परीक्षणाने पाळलेले नाही.

(२) लेखाची भाषा जिज्ञासू सामान्य किंवा व्युत्पन्न वाचकास कळेल अशी असावी. हे पथ्यही समीक्षकाने येथे सर्वत्र पाळलेले दिसत नाही. उदाहरणार्थ, पृ. ८८ वरील 'वास्तविक मराठी वाङ्मयाचे अध्यापन ही एक चैतन्यशील स्पंदवर्ती भाव भूमिका असते. शिक्षक, अध्यापक व विद्यार्थी हे दोन महत्त्वपूर्ण घटक असून त्यांचे परस्परांशी असलेले नाते संतपरंपरेत श्रोता–वक्ता संवाद रूपाने प्रगट झाले आहे.' या वाक्यांचा अर्थ व संदर्भ अजिबात स्पष्ट होत नाही.

(३) कोणतेही विधान करताना त्याच्या पुष्टयर्थ पुरावा द्यावा लागतो. प्रस्तुत समीक्षणात हेही पथ्य पाळलेले नाही. उदाहरणार्थ, याच पानावरील 'या विभागातील सर्वात विवाद्य, तर्कदुष्ट व वस्तुस्थितीला हरताळ फासणारा लेख रा. भा. पाटणकरांचा आहे.' या वाक्यातील विशेषणांच्या पुष्टयर्थ येथे तरी कसलाच पुरावा दिलेला नाही. विशेषतः कोणत्या प्रकारची तर्कदुष्टता येथे आहे हे स्पष्ट करणे फार अगत्याचे होते. माझ्या लेखात तार्किकदृष्टया परस्पर–विसंगत ठरतील अशी विधाने आहेत का ? कोणती ? पुढे मांडलेल्या पुराव्यावरून निघू न शकणारे निष्कर्ष मी काढले आहेत का ? कोणते ?

(४) लेखाचा विषय त्याच्या शीर्षकावरून व त्यातील मजकुरावरून स्पष्ट होतो. समंजस वाचकाची ही अपेक्षा मी पूर्ण केली आहे. म्हणून 'परंतु अँग्लो इंडियन लिटरेचर व मराठी साहित्य यांचे काही नातेसंबंध आहेत काय व असल्यास त्यामधून कोणत्या वाङ्मयीन समस्या निर्माण होऊ शकतात हे स्पष्ट करण्याऐवजी पाटणकर महाशय पाश्चिमात्य साहित्यातील जुनेच विचार डोलाने सांगतात.' हे श्री. जोशी यांनी केलेले विधान वाचून कोणालाही सखेद आश्चर्य वाटेल. माझ्या लेखाच्या चौकटीत अँग्लो–इंडियन लिटरेचरचा तौलनिक अभ्यास यावा ही अपेक्षा केली जाते याबद्दल आश्चर्य; व प्रस्तुत–अप्रस्तुताची अजिबात जाणीव नसलेल्यांनी समीक्षणात्मक लेख बिनधास्तपणे लिहावे व ते एका प्रातिनिधिक साहित्यसंस्थेच्या मुखपत्रात छापून यावेत याबद्दल खेद.

दुसरे असे की 'पाश्चिमात्य साहित्यातील जुनेच विचार' म्हणजे कोणते विचार ? पुन्हा 'जुने' म्हणजे 'महत्त्वशून्य' असे का मानायचे ? कांट, क्रोचे, कॉलिंगवुड यांनी मांडलेले १८ व्या ते २० व्या शतकातील विचार एखाद्याला जुने म्हणायचे असतील, तर तो तसे म्हणू शकेल; कारण सध्या जगभर गाजत असलेल्या डेरिडापेक्षा हे विचारवंत जुने आहेत हे खरेच. पण त्यांचे विचार आजही महत्त्वाचे, व विशेष म्हणजे आजही प्रस्तुत आहेत.

(५) श्री. जोशी लिहितात 'विशेष म्हणजे त्यांचे भारतीय साहित्याचे अज्ञान विलक्षण प्रत्ययकारी आहे.' मराठी मासिकात छापून आल्यामुळेच केवळ वरील वाक्य सार्थ मराठी वाक्य म्हणायचे इतकेच. ते पुढे म्हणतात 'भक्तीला पांचवा पुरुषार्थ मान्य करून रससंस्थेची मीमांसा मधुसूदन सरस्वतींनी केली परंतु त्याच्याकडे पूर्ण दुर्लक्षच नव्हे तर त्याची यत्किंचित दखलही न

घेता साहित्यशास्त्रात बदल करायला शास्त्रीलोक राजी नव्हते असे जेव्हा पाटणकर निष्कर्ष काढतात तेव्हा ते आपल्या मर्यादित अध्ययनाच्या सर्वच त्रुटी व उणिवांचा मात्र उत्तम प्रकारे परिचय करून देतात.' मधुसूदन सरस्वतींच्या 'भक्ति-रसायना'वर मी 'नवभारत' मासिकात (मार्च, १९८४ पृ. ७-१८) विस्तृत लेख लिहिला आहे. मधुसूदन सरस्वतींच्या या पुस्तकात घेतलेल्या भूमिकेमुळे काव्यशास्त्रात व केवलाद्वैती तत्त्व-ज्ञानात कशा अडचणी निर्माण होतात हे मी त्यात दाखविले आहे. तो जागरूक वाचकाने अवश्य वाचावा. मध्ययुगीन मराठीतील- रामदासाचा अपवाद सोडता- काव्यशास्त्राच्या अभावाबाबतची तक्रार डॉ. श्री. व्यं. केतकरांनी प्रथम केली. डॉ. मा. गो. देशमुखांसारख्यांचे या-बद्दलचे लिखाण महत्त्वाचे आहे. हे जरी मान्य केले, तरी केतकरांच्या तक्रारीचे पूर्ण निराकरण झाले आहे असे म्हणवत नाही. श्री. जोशी लिहितात, 'त्यांचा संपूर्ण लेखच मुळी अप्रस्तुत दोषांचे मूर्तिमंत उदाहरण आहे.' दोषांचे प्रस्तुत व अप्रस्तुत असे वर्गीकरण श्री. जोशी कोणत्या तत्त्वानुसार करतात हे अनाकलनीय गूढ आहे.

(६) कोणत्या कोणत्या गोष्टींच्या संदर्भात माझे वाचन कमी पडते हे दाखविण्याचा श्री. जोशी यांनी प्रयत्न केला आहे. त्यांचे परीक्षण वाचल्यावर त्यांनी स्वत: माझा लेख तरी नीटपणे वाचला आहे का, किंवा त्यांना तो कळला आहे का याबद्दल शंका येऊ लागते. कारण माझ्या लेखातील महत्त्वाच्या अशा कोणत्याच मुद्याला त्यांनी स्पर्श केलेला नाही.

(१) मी साहित्यसमीक्षेचे स्वरूप, तिचे आणि कलासमीक्षेचे व समीक्षेच्या समीक्षेचे (मेटॅ-क्रिटिसिझम) संबंध याचे विवेचन केले आहे; तसेच समीक्षा, साहित्य इत्यादींचे विद्या-पीठांमधील अध्यापन कोणत्या मर्यादांच्या चौकटीत करावे लागते याबद्दलही लिहिले आहे.

(२) आपण ज्या सामाजिक सांस्कृतिक समूहाचे सभासद असतो त्याच्याकडून मिळालेल्या संकल्पनादी आपल्या समीक्षाव्यापारात अपरिहार्य-पणे उपस्थित असतात. त्यांच्या साहाय्याने वाङ्मयीन सिद्धांतांची मांडणी करताना होणाऱ्या संभाव्य चुकांकडे लक्ष वेधले आहे.

(३) साहित्य, विविध विद्याशाखा, व सांस्कृतिक परंपरा यांच्यातील संबंध तपासले आहे.

(४) पॅवटी संस्कृत संकल्पनाव्यूह व आज-कालचा पाश्चात्य संकल्पना-व्यूह यांच्या आपल्या आजच्या समीक्षेवर झालेल्या परिणामांबद्दल, व ते तसे का झाले असावेत याबद्दल चर्चा केली आहे. हे विषय महत्त्वाचे आहेत. त्यांच्यावरच्या माझ्या विवेचनाबद्दल गंभीरतेच्या व पुरेशा तयारीने जर कोणी वाद सुरू केला तर ते सर्वांना उपकारकच ठरणार आहे; व म्हणून असे वाद स्वागतार्ह ठरतील. परंतु श्री. जोशी यांनी लिहिलेल्या तीन पानी मजकुरात वर उल्लेखिलेले कोणतेही गुण नाहीत.

'मराठीचा प्राध्यापकच नव्हे तर मराठीचा कोणताही विद्यार्थी पाटणकरांना माहिती देऊ शकला असता.' हे श्री. जोशी यांचे वाक्य त्यांच्या लिखाणाच्या पद्धतीचे व पातळीचे द्योतक असले तरी माझी मात्र कोणाकडूनही मूल्ययुक्त असे काहीही शिकण्याची तयारी आहे.

रा. भा. पाटणकर
२ शाकुंतल, साहित्य सहवास
वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१

पुणे विद्यापीठात श्रीज्ञानदेव अध्यासनाची स्थापना

मु. श्री. कानडे
प्रमुख कार्यवाह, श्रीज्ञानदेव अध्यासन समिती

संतवाङ्मयाच्या सर्वांगीण अभ्यासासाठी मराठी संतांचे अग्रणी असलेल्या संत ज्ञानदेवांच्या नावाने पुणे विद्यापीठामध्ये एक अध्यासन निर्माण करण्याचा संकल्प आता साकार झालेला आहे. या अध्यासनाच्या परिपूर्तीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व व्यावहारिक व तांत्रिक गोष्टी पूर्ण होऊन संत-वाङ्मयाचे गाढे अभ्यासक डॉ. वि. रा. करंदीकर यांची या अध्यासनाचे प्राध्यापक म्हणून निवड झालेली आहे आणि डॉ. करंदीकरांनी शनिवार दि. ३० एप्रिल १९८८ या दिवशी या अध्यासनाची रीतसर सूत्रे स्वीकारलेली आहेत. हे अध्यासन विद्यापीठातील मराठी विभागाशी संलग्न राहणार आहे.

पुणे विद्यापीठ हे मराठी भाषा, मराठी वाङ्मय, मराठी इतिहास यांच्या अभिवृद्धीसाठी स्थापन झालेले असल्याने या अभ्यासविषयांच्या सर्वांगीण अध्ययन–संशोधनासाठी विविध अध्यासने निर्माण होणे अत्यंत आवश्यक आहे. विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. मु. श्री. कानडे यांनी पुढाकार घेऊन संतवाङ्मयविषयक संशोधनाचे केंद्र होईल असे एक अध्यासन स्थापन करण्याचा संकल्प सोडला व त्याच्या निर्मितीसाठी श्रीज्ञानदेव अध्यासन समिती स्थापन करण्यात आली. वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू ह. भ. प. धुंडामहाराज व ह. भ. प. किसन महाराज साखरे आदी मंडळी या समितीत आनंदाने सहभागी झाली. पुणे विद्यापीठाचे त्यावेळचे कुलगुरू डॉ. राम ताकवले यांनाही ही कल्पना आवडली. त्यामुळे विद्यापीठानेही या अध्यासनाच्या उभारणीला आपली मान्यता दिली.

आळंदी–पंढरीचे वारकरी आणि संतवाङ्मयाबद्दल अगत्य बाळगणारे इतर सज्जन यांच्या साहाय्याने निधी जमविण्यास प्रारंभ झाला. ठिकठिकाणच्या मराठीच्या प्राध्यापकांनी व विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने निधी संकलनाचे काम पत्करले. एखाद्या मोठ्या धनाढ्य व्यक्तीकडून देणगी मिळविण्यापेक्षा साऱ्या महाराष्ट्राला वंदनीय असणाऱ्या ज्ञानबा–तुकारामांबद्दल श्रद्धा बाळगणाऱ्या सामान्य व्यक्तीलाही यात सहभागी होता यावे अशा उद्देशाने अगदी एक रुपयापासून निधी गोळा करण्यात आला.

पुण्यातील एक थोर ज्ञानदेव–भक्त प्राचार्य अनंतराव आठवले यांनी मुंबई व पुणे येथे आपल्या कीर्तन–प्रवचनांचे कार्यक्रम करून या अध्यासनासाठी सुमारे तीन लाख रुपयांचा निधी मिळवून दिला. या महनीय कार्यामुळे, हे अध्यासन लवकरात लवकर उभे राहावे अशी तळमळ असणारे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वि. ग. भिडे हेही प्रभावित झाले. त्यांनी विद्यापीठाच्यावतीने दोन लाख रुपये मंजूर करवून घेतले व एकूण सात लाखांचा स्थिर निधी या अध्यासनासाठी आज विद्यापीठा-जवळ जमलेला आहे. एक रुपयापासून २१ हजार रुपयापर्यंत देणग्या देणाऱ्या सुमारे पंचवीस हजार

संतभक्तांनी या निधीमध्ये आपापला लहान-मोठा वाटा उचललेला आहे. केवळ लोकाश्रयाच्या बळावर स्थापन झालेले हे महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातीलही एकमेव अध्यासन असावे.

या अध्यासनाला संत ज्ञानदेवांचे नाव दिलेले असले तरी या अध्यासनाचे स्वरूप अत्यंत व्यापक असावे अशी अध्यासन समितीची प्रारंभापासूनची भूमिका आहे. केवळ मराठी भाषेतीलच नव्हे तर अन्य भारतीय व पाश्चात्य भाषांतील संतवाङ्मयाचा अभ्यास करणारे वेगवेगळे संशोधन प्रकल्प या अध्यासनाच्यावतीने अभ्यासक व निधी यांच्या उपलब्धीप्रमाणे हाती घेण्यात यावे अशी समितीची प्रारंभापासूनची भूमिका आहे. संतवाङ्मयाबद्दल आस्था बाळगणाऱ्या व्यक्ती वरील दोन्ही दृष्टीने या अध्यासनाच्या कार्याला सहकार्य देतील असा विश्वास वाटतो. तात्विक अभ्यासाबरोबरच संतवाङ्मयाच्या प्रकाशनाला अनुदान प्राप्त करून देणे, प्रतिवर्षी संतविषयक सर्वोत्कृष्ट समीक्षा ग्रंथाला पुरस्कार देणे, संतवाङ्मयासाठी ठिकठिकाणी व्याख्यानमाला व चर्चासत्रे आयोजित करणे, आयुष्यभर संतांच्या शिकवणुकीचा प्रसार करणाऱ्या कीर्तनकार-प्रवचनकारांचा सन्मान करणे, संतसाहित्याचे एक सुसज्ज ग्रंथालय उभारणे असे अनेक संकल्प अध्यासन समितीच्या मनात आहेत. यापैकी काही उपक्रम यापूर्वीच सुरू झालेले आहेत. ■



सुरेश घड्याळपाटील, नागपूर

केन्द्रीय कार्यवृत्त / दि. १ जुलै ते ३० सप्टेंबर १९८८

दि. ३ जुलै ८८ रोजी वि. सा. संघ व नागपूर प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने श्री. मनोहर वि. गोखले यांनी लिहिलेल्या 'मनोहर न्यायकथा.' व 'माजी राष्ट्रपती एम्. हिदायतुल्ला' ह्या दोन पुस्तकांचा प्रकाशन समारंभ गडकरी सभागृहात आयोजित केला होता. दोन्ही पुस्तकांचे प्रकाशन वि. सा. संघाध्यक्ष राम शेवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली न्यायमूर्ती व्ही. ए. मोहता यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी न्यायमूर्ती वी. जी. देव व अॅड. वी. व्ही. गायकवाड यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे संचालन नागपूर प्रकाशनचे श्री. मामा गंधे यांनी केले.

दि. १४-७-८८ रोजी कै. डॉ. य. खु. देशपांडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला.

दि. १८-७-८८ रोजी कै. अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला. सामाजिक एकता प्रबोधन मंच, आंबेडकर विचार संवादिनी व विदर्भ साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने कै. अण्णाभाऊ साठे यांना श्रद्धांजली वाहण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. या प्रसंगी सर्वश्री नेताजी राजगडकर, डॉ. विमल किर्ती, नागेश चौधरी; डॉ. प्रकाश खरात व एम. एन. भावे यांनी आपले विचार मांडले.

दि. १९-७-८८ वि. सा. संघाच्या परीक्षासमितीतर्फे गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना संघाध्यक्ष श्री. राम शेवाळकर यांच्या हस्ते प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आली. या प्रसंगी बोर्डातील गुणवत्ता प्राप्त अंध विद्यार्थी श्री. घनश्याम व विनोद आमुदानी तसेच मराठी विषयात सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या कु. अनुभूती मेटकर यांचा सत्कार करण्यात आला.

कै. सौ. विजया देवपुजारी महिला एकांकिका स्पर्धा १९८८ दि. २३ व २४ जुलै / विदर्भ साहित्य संघातर्फे दरवर्षी घेण्यात येणाऱ्या कै. सौ. विजया देवपुजारी स्मृति महिला एकांकिका स्पर्धा यंदा दिनांक २३, २४ जुलै १९८८ या दिवशी धनवटे रंगमंदिरात संपन्न झाल्या. यावर्षी या स्पर्धेत एकूण ११ एकांकिका सादर झाल्या. यावर्षी स्पर्धेत एकांकिकांची संख्या जरी कमी असली तरी स्पर्धेतील एकांकिकांची सादरीकरणाची पातळी उच्च दर्जाची होती. ही स्पर्धा यशस्वी करण्यास सौ. कुमुद पाठक, व श्री. दिनेश दगडकर यांनी अथक परिश्रम घेतले. या स्पर्धेत श्रीयुत वळी कोलते, सौ. प्रतिमा आकरे, सौ. वत्सला पोलकमवार यांनी परीक्षक म्हणून सहकार्य दिले. दिनांक २४ जुलै रोजी धनवटे रंगमंदिरात या स्पर्धेच्या पारितोषिक विजेत्यांना वि. सा. संघाचे अध्यक्ष श्रीयुत राम शेवाळकर यांचे हस्ते पारितोषिके दिल्या गेली.

निर्मितीची पारितोषिके

क्रमांक	संस्थेचे नाव	एकांकिका	पारितोषिक
प्रथम	रंजन कला मंदिर नागपूर	"जान्हवी"	व्यंकटेश ब्रह्मदेव जागीरदार फिरती ढाल व वि. सा. संघ रोख पारितोषिक रु. ३०१/– व प्रशस्तीपत्र.
द्वितीय	दलित रंगभूमी नागपूर	"आशा"	उत्कर्ष कला मंदिर फिरती ढाल व वि. सा. संघ पारितोषिक रु. २०१ /– रोख व प्रशस्तीपत्रक.
तृतीय	पैंजण रंगभूमी नागपूर	"रंग माझा वेगळा"	वि. सा. संघ व कै. यशोदाबाई मोरे संयुक्त पारितोषिक रु. १०१/- प्रशस्तीपत्रक.
उत्तेजनार्थ	नाटचश्री नागपूर	कोण म्हणतं टक्का दिला ?	वि. सा. संघातर्फे प्रशस्तीपत्रक

अभिनयाची पारितोषिके

क्रमांक	कलावंताचे नाव	भूमिका	एकांकिका	संस्था	पारितोषिक
प्रथम	कु. मिनाक्षी वोरकर	'शेवंता'	'आशा'	दलित रंगभूमी नागपूर	वि. सा. संघातर्फे कै. मनोरमाबाई पोतदार पारितोषिक ५१/– रोख, रसिक रंजन प्रस्तुत कै. मनिषा वेळेकर स्मृति फिरते मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक.
द्वितीय (विभागून)	शुभांगी सावरकर नेहा नांदेडकर	'ज्युली' 'राधा'	'अस्पर्श' 'रंग माझा वेगळा'		वि. सा. संघातर्फे प्रशस्तीपत्रक

श्री. चंद्रकांत कुळकर्णी पुरस्कृत १० वर्षाखालील बालकलावंतांचे कै. सुशीलाबाई कुळकर्णी स्मृति पारितोषिक रु. ५१/– रोख, कु. कल्याणी करकरे या कलावंतास नाटचश्री या संस्थेच्या कोण म्हणतं टक्का दिला ? या एकांकिकेतील कल्याणी भूमिकेसाठी देण्यात येत आहे.

सर्वोकृष्ठ दिग्दर्शनाचे पारितोषिक रु. १०१/– रोख, वि. सा. संघ व कै. यशोदाबाई मोरे संयुक्त पारितोषिक सौ. सारिका पेंडसे यांना 'जान्हवी' एकांकिकेच्या दिग्दर्शनासाठी देण्यात येत आहे.

श्री. सुधाकर बक्षी पुरस्कृत कै. सौ. कमलाबाई बक्षी स्मृती पारितोषिक १०१/– रोख सौ. प्रभा देऊस्कर यांना संघर्ष एकांकिकेच्या सर्वोत्कृष्ठ लेखनासाठी देण्यात येत आहे.

परीक्षकांच्या शिफारशीने द्यावयाची प्रशस्तीपत्रके

(१) दिग्दर्शन उत्तेजनार्थ	दिप्ती खर्डेनवीस	एकांकिका	कोण म्हणतं टक्का दिला ?
(२) अभिनय उत्तेजनार्थ	गौरी खर्डेनवीस	एकांकिका	,,
(३)	मोनाली मोहरीर	एकांकिका	इश्य गडे महिला मंडळ
(४)	सौ. अनिता जोशी		ऐसे नवल वर्तले.

दि. ३० व ३१ जुलै १९८८– वि. सा. संघाच्या कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर व्याख्यानमालेअंतर्गत श्री. मे. पु. रेगे यांची आविष्कारवादी तत्त्वज्ञान व आविष्कारवादी सौंदर्यशास्त्र या विषयांवर अतिशय विचारप्रवर्तक भाषणे झाली.

दि. १ ऑगस्ट १९८८ वि. सा. संघातर्फे कविवर्य कै. अण्णाजी बोबडे स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला.

दि. ३ व ४ ऑगस्ट १९८८ वि. सा. संघाच्या गणेश व्याख्यानमालेअंतर्गत श्री. भालचंद्र पेंढारकर यांची दोन व्याख्याने सूरगंगा आणि शब्दगंगा या विषयावर आयोजित केली होती. त्यास नाट्यरसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दाद दिली.

वि. सा. संघाने ही गणेश व्याख्यानमाला १९६० साली सुरू केली. आज त्याचे २९ वे वर्ष आहे. या अंतर्गत पहिले व्याख्यान वेदमूर्ती पं. सातवळेकर यांचे झाले होते त्यानंतर आतापावेतो श्री. देगलूरकर, श्री. अप्रबुद्ध, डॉ. वि. रा. करंदीकर, डॉ. अ. ना. देशपांडे, डॉ. यु. म. पठाण, श्री. दाजीशास्त्री पणशीकर, डॉ. द. भि. कुळकर्णी, डॉ. व. दि. कुळकर्णी इत्यादी मान्यवरांची व्याख्याने झाली.

दि. ५ ऑगस्ट १९८८ डॉ. राधाकृष्णन यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांचे प्रतिमेस हार अर्पण करण्यात आला.

दि. ६ ऑगस्ट १९८८ वि. सा. संघ नागपूर तर्फे सौ. शुभांगी भडभडे यांनी रामकृष्ण परमहंस यांच्या जीवनावर लिहिलेल्या 'स्वयंभू' या कादंबरीचे प्रकाशन श्री. राम शेवाळकर यांचे हस्ते झाले. या प्रसंगी डॉ. सौ. नीला जोशीराव, डॉ. वसंत वऱ्हाडपांडे यांची कादंबरीविषयी भाषणे झाली व त्यानंतर डॉ. वि. भि. कोलते यांनी आशीर्वादपर भाषण केले.

दि. ९, १० ऑगस्ट १९८८ वि. सा. संघाच्या वतीने कै. इंदिराबाई खरे वक्तृत्व स्पर्धा माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांकरिता आयोजित केली होती. विषय खालीलप्रमाणे होते. प. जवाहरलाल नेहरू, दूरदर्शनवरील आवडती मालिका, वाचनालय, क्रिकेट सोडून तुमचा आवडता खेळ.

दि. १० ऑगस्ट १९८८ श्रीमती वीणाताई हरदास, रसिक आणि विदर्भ साहित्य संघ यांचे संयुक्त विद्यमाने विद्यावाचस्पती विष्णूजी क्षीरसागर यांची 'महामहोपाध्याय बाळशास्त्री हरदास व्यक्ति आणि कार्य' या विषयावर दोन व्याख्याने आयोजित केली. याप्रसंगी श्रीमती वीणाताई हरदास यांनी लिहिलेल्या 'आर्य चाणक्य भाग–२' या पुस्तकाचे प्रकाशनही करण्यात आले.

कै. रघुनाथराव आष्टीकर स्मृति विनोदी एकांकिका स्पर्धा १९८८

दि. १२, १३ सप्टेंबर विदर्भ साहित्य संघाच्या स्पर्धा समितीतर्फे दरवर्षी घेण्यात येणारी कै. रघुनाथराव आष्टीकर स्मृति विनोदी मराठी एकांकिका स्पर्धा यंदा दिनांक १२ व १३ सप्टेंबर

१९८८ या दिवशी धनवटे रंग मंदिरात उत्साहाने संपन्न झाली. या स्पर्धेत एकूण ९ एकांकिका सादर झाल्या. या स्पर्धेत श्रीयुत चंद्रकांत कुळकर्णी सौ. श्रद्धा तेलंग, सौ. सुहासिनी लाडकर यांनी परीक्षक म्हणून सहकार्य दिले. दिनांक १३ सप्टेंबर रोजी धनवटे रंगमंदिरात या स्पर्धेच्या पारितोषिक विजेत्यांना सौ. शोभा उबगडे यांचे हस्ते पारितोषिके दिल्या गेली. श्री. दिनेश दगडकर यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी बरेच श्रम घेतले. निकालपत्र पुढीलप्रमाणे.

निर्मिती	एकांकिका	संस्था	पारितोषिक
प्रथम	'पुंडलीकाचे भेटी'	राष्ट्रभाषा प्रचार समिती नागपूर	कै. गणेश सखाराम अंधारे फिरती ढाल व ३०१/– रोख
द्वितीय	गेला क्षण	रंजन कला मंदिर नागपूर	२०१/– रोख
तृतीय	हिपहिप हुर्रे	नाट्य पारिजात नागपूर	१०१/– रोख
उत्तेजनार्थ	वायफळ	अभिनय नागपूर	प्रशस्तिपत्र

अभिनयाची पारितोषिके तथा लेखन व दिग्दर्शन

अभिनय : पुरुष (प्रथम) श्री. अजय घारे 'पुंडलीकाचे भेटी', राष्ट्रभाषा प्रचार समिती नागपूर. ५१/– रुपये व प्रशस्तिपत्र.

अभिनय : पुरुष (द्वितीय) राजेश चिटणीस, हिपहिप हुर्रे नाट्य परिजात नागपूर २५/– रुपये व प्रशस्तिपत्र

अभिनय : पुरुष (उत्तेजनार्थ) श्री. चंचलकुमार चौधरी 'प्रस्ताव' रिझर्व बॅंक ऑफ इंडिया एम्प्लॉईज असोसिएशन (सांस्कृतिक मंच) नागपूर प्रशस्तिपत्रक.

अभिनय : स्त्री (प्रथम) गौरी खर्डेनवीस 'पुंडलीकाचे भेटी' राष्ट्रभाषा प्रचार समिती नागपूर. ५१/– रुपये रोख व प्रशस्तीप्रत्रक.

अभिनय स्त्री (द्वितीय) भारती परसटवार प्रस्ताव रिझर्व बॅंक ऑफ इंडिया नागपूर २५/– रोख व प्रशस्तीपत्रक.

अभिनय (स्त्री) उत्तेजनार्थ राधिका पेंडसे, गेला क्षण, रंजन कला मंदिर नागपूर प्रशस्तीपत्रक.

दिग्दर्शन (प्रथम) श्री. दिलीप पेंडसे, पुंडलिकाचे भेटी, राष्ट्रभाषा प्रचार समिती नागपूर ७५/– रुपये व प्रशस्तिपत्रक.

लेखन (प्रथम) प्रा. प्र. वि. सोहोनी हिपहिप हुर्रे नाटय पारिजात नागपूर. ५१/– रुपये व प्रशस्तीपत्रक.

दि. २३–९–८८ कै. मामा वरेरकर यांच्या स्मृतिदिनी त्यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

दि. ३०–९–८८ रोजी वि. सा. संघातर्फे विदर्भातील युवा कवी–कवयत्रींचे कविसंम्मेलन आयोजित केले होते. त्यात सर्वश्री. सुहास उगवे (अध्यक्ष) प्रमोद कळमळकर (नागपूर); अजीम

नवाज राही (साखरखेर्डा), संजय डोंगरे (वाडेगाव), किशोर वेरुळकर (वलगांव); धनंजय करमरकर (आर्वी) कु. रजनी नवले (नागपूर), विजय सोरते (आरमोरी), प्रशांत गावंडे (यवतमाळ) प्रमोद पांडे (अकोला), रवी आटे (पुलगाव), राजेश डोंगरे, (आडेगाव), कु. शुभांगी डोरले (कारंजालाड), राहूल हुमणे (नागपूर), दीपक रंगारी (वर्धा) यांनी आपल्या कविता सादर केल्या. याप्रसंगी सुप्रसिद्ध कवी श्री. नारायण सुर्वे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. व अध्यक्षस्थानी संघाध्यक्ष प्रा. राम शेवाळकर होते. कविसंम्मेलनाचे सूत्रसंचालन श्री. सुनील शिनखेडे यांनी केले. रसिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

परीक्षा समिती

२ जुलै १९८८ रोजी परीक्षा समितीची बैठक झाली. प्रथम सत्र व ऑक्टोबर १९८८ व द्वितीय सत्र ४ व ५ फेब्रुवारी १९८९ या परीक्षा तिथी निश्चित करण्यात आल्या.

१३ जुलै १९८८ रोजी वि. सा. संघाचे उपाध्यक्ष श्री. वामनराव तेलंग यांचे शुभहस्ते वार्षिक प्रमाणपत्र व पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम संपन्न झाला. याच प्रसंगी बोर्डातील गुणवत्ताप्राप्त विद्यार्थी श्री. घन:श्याम आसुदानी, श्री. विनोद आसुदानी व कु. अनुभूती मेटकर (बोर्डात मराठी विषयात सर्वप्रथम) यांचा पारितोषिके देऊन सत्कार करण्यात आला.

१३ ऑगस्ट १९८८ परीक्षा समितीचे केंद्राधिकारी, प्रसिद्ध कवी व कथाकार श्री. दे. शि. दुधलकर व सौ. सुलभा बक्षी यांच्या दुःखद निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडून मूक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

परीक्षा समितीची आगामी सत्रातील परीक्षा ४ व ५ फेब्रुवारीला असून आवेदन पत्रे भरून पाठविण्याची अंतिम तारीख ५ डिसेंबर ही आहे.

मागील अंकातील चुकीची दुरुस्ती

(१) जाने १९८७ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षांत सर्वाधिक परीक्षार्थी व परीक्षा शुल्काचा मान प्रतिवर्षी प्रमाणे यशवंत महाविद्यालय वर्धा या केंद्रासच प्राप्त झाला होता. अन्य केंद्रांना प्रोत्साहन मिळावे म्हणून त्यासंबंधीचा पुरस्कार मात्र सर्वानुमते अन्य केंद्रांना देण्यात आला. गेल्या अंकात उपरोक्त उल्लेख करण्याचे राहून गेले होते. म्हणून हा खुलासा.

(२) यशवंत महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. कृष्णा लक्ष्मीनारायणजी राठी असे आहे. चुकीने श्रीकृष्ण लक्ष्मीनारायणजी राठी असे छापले गेले होते. क्षमस्व.

श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय

विदर्भ साहित्य संघाच्या श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयासाठी श्री. आ. चि. भोयर यांनी सत्यकथेचे दुर्मिळ व बहुमूल्य अंक भेट म्हणून दिले.

गेल्या तीन महिन्याच्या अवधीत वेळोवेळी संपन्न होणाऱ्या मान्यवर साहित्यिकांच्या जयंती; स्मृतिदिनाप्रित्यर्थ त्यांचा साहित्याचे यथोचित ग्रंथ प्रदर्शन मांडण्यात आले.

या कालावधीत अंदाजे २५० संदर्भ ग्रंथांची भर पडली. ■

आजीव सभासद १ जुलै १९८८ ते ३० सप्टेंबर १९८८ पर्यंत

सौ. पुष्पलता विजयकुमार तिडके, श्री. आनंद गोविंदराव पैठणकर; श्री. योगेश बऱ्हाणपुरे; सौ. प्रतिमा गुलाबराव आकरे, श्री. गुलाबराव शामराव आकरे, दिलीप दत्तात्रयपंत पेंडसे; श्री. बी. आर. मिटकरी, श्री. ॲड. रामराव सदाशिवराव राऊत, श्री. विनोद पांडुरंगपंत सहस्रबुद्धे, श्री. आनंद घारपूरे, श्री. मदन मंडलेकर, श्री. विजय मंडलेकर, श्री. सुभाष मंडलेकर, श्री. राजेन्द्र मंडलेकर, श्री. प्रदीप मंडलेकर, श्री. मिलींद घारपुरे, श्री. शाम वसंतराव देशपांडे, श्री. लक्ष्मण विश्वनाथराव पांढरीपांडे, श्री. मनोहर विघ्नेश्वरराव पंडे, श्री. गजानन बळीरामपंत पलांदूरकर, श्री. संजय वासुदेव कठाळे, श्री. देवराव नत्थुजी कारेमोरे, श्री. अविनाश जयराम किन्हीकर, श्री. विकास वसंतराव मोहरीर, श्रीमती शीला भरतकुमार कोलटकर, श्री. दिनेश विठ्ठलराव दगडकर, श्री. हरीश्चंद्र विठोबा गोमाशे (सर्व नागपूर) श्री. छबिलाल लाडकन रहांगडाले, श्री. दयाराम गोंदूजी अतकरी, श्री. श्रावण विस्तारी बोरकर, श्री. भिकू हुगरूजी भुरे, श्री. रामकृष्ण शिवरामजी धांडे, श्री. डॉ. गुरुप्रसाद गो. पाखमोडे, (सर्व लाखनी) श्री. नरेन्द्र महादेवराव निळे, कु. वत्सला धर्माजी कोल्हे, सौ. रत्नमाला विनायकराव लखदिवे, श्रीमती ॲगनेस लुईस पीटर (सर्व बल्लारपूर) श्री. अशोक गंगाधर पंत मेनकुदळे (यवतमाळ) श्री. डॉ. दशरथ शामराव शिंदे (दुसरबीड) श्री. प्रा. श्री. उ. गो. रुद्रवार (पुसद) श्री. सदाशिव त्र्यंबक कुल्ली (बुलढाणा) श्री. डॉ. श्री. माधवराव भदूजी मस्के (भंडारा) श्री. धनजीभाई विरजीभाई शाह (मूल) कु. प्रभावतीबाई आनंदराव डहाके, श्री. सुभाष विठ्ठलराव इंगोले (सर्व मूर्तिजापूर) श्री. प्रभाकरराव टापरे, (जळगाव) श्री. रमेशबाबु बालमुकूंदजी गुप्ता, श्री. भाऊराव विठोबाजी ठाकरे, श्री. प्रा. बालकृष्णराव कुर्वे, श्री. पांडुरंग गोविंदराव कटारे, श्री. रमेश संतोषराव कळंभे, श्री. प्रा. गोविंद शेकोजी खंडारे, श्री. रमेश लक्ष्मणराव तातोडे, श्री. गुणवंतराव आरघोडे, श्री. रमेश तुकारामजी पोतदार, श्री. आनंदराव मारोतराव गुरमुळे, श्री. प्रा. मधुकर पांडुरंगजी गायधने, श्री. प्रमोद टोणपे, श्री. अरुण शामरावजी सरूर्डे, श्री. भाऊराव लहानूजी भोगे, श्री. रतनराव कह्याते, श्री. रामराव तुळशीराम ढोके, श्री. मधुकरराव चांदेकर, श्री. रमेश रेवतकर, श्री. प्रमोद झटाले, श्री. चंद्रकांत विठोबाजी वसुले, श्री. किशोर फुलचंदजी रावत, श्री. भाऊराव महादेव मुद्गल, श्री. अंबादास गोविंदराव मदनकर, सौ. उषा राजेन्द्रबाबु पोतदार, श्री. देवराव केबिरामजी टेकाडे (सर्व नरखेड) सौ. अपेक्षा अ. तारे; सौ. सुभ्रा पु. काळे, सौ. प्रतिभा प. पंडीत, सौ. मंदा पंकिने, सौ. वसुधा घुरडे, कु. शोभा पांडे, श्री. द. श. जोशी, श्री. रत्नाकर ना. पांडे, श्री. डॉ. रमेश ल. गोडबोले, श्री. ह. गो. पिंपळगांवकर; श्री. घ. व. ककरानिया, श्री. ललित न. देशमुख, अण्णाजी ल. पाचकोर, श्री. मुकूंद अ. लिमये, श्री. सत्यनारायण रेळे, श्री. रत्नाकर शं. देशमुख, श्री. शं. प. कासट, श्री. शशी उ. पिंपळगांवकर, श्री. रा. चिमोटे, श्री. नंदकिशोर बजाज, श्री. दि. मा. महाजन, श्री. रमेश वि. महाजन, श्री. अ. वा. भोंदू, श्री. केशव मो. मासोदकर, श्री. सु. ना. भावे, श्री. रवि. उ. पिंपळगावकर, श्री. गो. भि. अग्रवाल, श्री. स. दे. पांडे, श्री. वि. ल. कांत, श्री. अ. दण्डे, कु. सुलभा रा. पितळे; श्री. अंबादास गोविंद आंबेकर, श्री. चंद्रकात मारोतराव राऊत, श्री. डॉ. सुशीला बळीरामजी पाटील; श्री. पुरुषोत्तम शिवशंकर जियणकर (सर्व अमरावती). ■

दुसरबीड

दि. ४-७-८८ रोजी शाखेने प्राचार्य मुंढे यांच्या उपस्थितीमध्ये ग्रंथ प्रदर्शन नवीन विकास विद्यालयामध्ये आयोजित केले होते. त्यानंतर शाखेची बैठकही आयोजित केली गेली व पुढील वार्षिक बैठकीबद्दल विचार विनिमय झाला.

ब्रम्हपुरी

(१) शाखेच्या वतीने स्व. मणीलाल एकांकिका स्पर्धा दि. २१-१-८८ दरम्यान आयोजित केल्या होत्या. स्पर्धेचे हे आठवे वर्ष होते. या स्पर्धेचे निकाल खालील प्रमाणे आहेत. उत्कृष्ट निर्मिती-(१) प्रथम क्र. कला निकेतन नागपूर निर्मिती " शल्य राहिले उरी " स्व. मणीलाल जिवाणी स्मृति फिरती ढाल व ३०१ रु. रोख. द्वितीय क्रमांक- एन. एस. यु. आय. ब्रम्हपुरी निर्मिती " आलीया भोगासी " रोख रु. २०/-

तृतीय क्रमांक- महात्मागांधी महाविद्यालय आरमोरी निर्मिती "जहाज फुटल आहे. उत्कृष्ट दिग्दर्शिका- प्रथम क्रमांक-कला निकेतन नागपूर चे श्री. सुनिल देशपांडे, प्रा. सुभाष बजाज फिरती ढाल व रोख रु. ५१/- द्वितीय क्रमांक- श्री. पु. या. चोरीकर " बोलाचीच कढी " या एकांकिके साठी. स्पर्धेचे उद्घाटन नागपूर पत्रिकेचे वृत्तसंपादक श्रीकांत कुळकर्णी यांचे हस्ते तर बक्षीस वितरण समारंभ नागभिडला गोविंदराव वार्जूरकर महाविद्यालयाचे प्राचार्य राजन जयस्वाल यांचे हस्ते पार पडला.

(२) शाखेच्या वतीने प्राचार्य राजन जयस्वाल, गोविंदराव वार्जूरकर महाविद्यालय नागभीड लिखित " कानेटकरांचे नाटचसृष्टी " या पुस्तकावर ग्रंथ चर्चा दि. १०-२-८८ ला आयोजित केली होती. प्रारंभी प्रा. विजय मुंढे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. तर संचालन प्रा. बी. जी. रडे यांनी केले. या कार्यक्रमांत स्वत: लेखक प्रा. राजन जयस्वाल, सृजनप्रकाशन तर्फे श्री. सुनील शिनखेडे, समीक्षक नात्याने प्रा. केशव मेश्राम यांनी भाग घेतला प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. सौ. आशा सावदेकर यांनी मार्गदर्शनपर यथोचित भाषण दिले.

दिग्रस

ता. ११-८-८८ रोजी प्रसिद्ध कवी श्री. बबन सराडकर यांनी शाखेला भेट दिली सचिव प्रा. राम मायगोले यांनी त्यांचें स्वागत केले. श्री. सराडकरांचा गायनाची मैफील झाली. प्रा. केशरवाणी यांनी शाखेविषयी माहिती दिली.

काटोल

विदर्भ साहित्य संघ काटोल शाखेतर्फे शिक्षण महाविद्यालय काटोल येथे दि. १५ ऑगस्ट १९८८ ला दुपारी २ वाजता नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनावर सुप्रसिद्ध कथा-कथनकार श्री. श. मा. पुसदकर यांचे कथाकथन आयोजित केले. या प्रसंगी बोलतांना श्री. पुसदकर यांनी सुभाषचंद्राचा स्वातंत्र्यसंग्राम मृत्युंजयाचा आत्मा होता असे उद्गार काढले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाखेचे अध्यक्ष प्रा. कृष्णकांत विडकर होते, आभार प्रदर्शन डॉ. के. एम. भांडारकर

यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता सहसचिव प्रा. ए. आर. तरार सदस्य डॉ. डी. एफ. चांदुरकर व प्रा. पी. जी. भोयर यानी परिश्रम घेतले.

आकोट

शाखेच्या वतीने प्रा. भाऊ भालेराव, बाबासाहेब उदासी, गजानन जागीरदार, दे. शि. दुधलकर, या मान्यवरांच्या दु:खद निधनाबद्दल प्राचार्य दादासाहेब देवके यांचे अध्यक्षतेखाली श्रद्धांजली अर्पण करण्याचा कार्यक्रम कृषि विद्यालय आकोट येथे दि. १७–८–८८ ला घेण्यात आला. प्राचार्य देवळे, प्रा. निचल, प्रा. रा. गो. चवरे, प्रा. अंबाडकर, सौ. सुमनताई पोटे, मुख्याध्यापक माणिकराव पोटे कवी श्री. गजानन हंगडे, प्रा. भुयार या सुहृदांनी आपली शोकसंवेदना व्यक्त केली.

दि. ११–९–८८ रोजी शाखेच्या वतीने स्थानिक कृषि विद्यालयात डॉ. राधाकृष्णन यांचा जन्मशताब्दी समारोह संपन्न झाला. कार्याध्यक्ष प्राचार्य दादासाहेब देवके हे अध्यक्षस्थानी होते. या प्रसंगी प्रा. अंबाडकर, प्रा. भुयार, प्रा. चवरे, प्रा. राऊत व सौ. सुमनताई पोटे यांची यांची भाषणे झाली.

अमरावती

जीवनव्रती दाजीसाहेब या प्रा. सतीश तराळ यांनी लिहिलेल्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ डॉ. श्रीकांत तिडके यांच्या हस्ते संपन्न झाला. विदर्भ साहित्य संघ शाखा अमरावती-तर्फे नगर वाचनालय अमरावती येथे प्राचार्य राम शेवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली हा समारंभ आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी अतिथी म्हणून डॉ. सुभाष सावरकर व श्री. उद्धव ज. शेळके उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दाजीसाहेबांना प्रिय असलेल्या जगदंब स्तोत्राने झाली. तपोवनच्या संचाने ते स्तोत्र गायिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन श्री. गोविंद कासट यांनी केले. आभार प्रदर्शन नानासाहेब पिंपळगावकर यांनी केले. या कार्यक्रमास श्रोत्यांची उपस्थिती चांगली होती.

चोहोट्टा बाजार

दिनांक १ ऑगस्ट १९८८ रोजी सार्वजनिक कनिष्ठ महाविद्यालयात विदर्भ साहित्य संघ शाखा चोहोट्टाच्या विद्यमाने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीचा समारंभ शाखा कार्याध्यक्ष प्रा. ज. पा. खोडके यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी शाखेचे सदस्य डॉ. दातकर, श्री. सुरेश बोडके, प्रा. आगरकर, सौ. शोकर्णाबाई आढे, श्री. रमेश मानकर इत्यादि मान्यवर उपस्थित होते. टिळकांच्या जीवनावर प्रा. आगरकर, प्रा. खोडके यांनी माहिती दिली.

१० ऑगस्ट १९८८ रोजी शाखेची बैठक होऊन त्यात महाराष्ट्राचे ख्यातनाम साहित्यिक श्री. भाऊ भालेराव यांना ॲड. प्रकाश गव्हाळ यांचे अध्यक्षतेखाली भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रा. ज. पां. खोडके यांनी भाऊ भालेराव यांच्या जीवनातील काही आठवणी या प्रसंगी सांगितल्या.

यावेळी शाखा कायम व्हावी म्हणून आजीव सदस्य वाढविण्याचे शाखा कार्याध्यक्षांनी आव्हान केले तसेच साहित्यिक पुरस्कार योजनेसाठी शाखेकडून कमीत कमी ५०१ रु. चा निधी केन्द्रीय कार्यालयाकडे जमा करण्याचा संकल्प केला.

जवाहर नगर

शाखेतर्फे शालान्त परीक्षेत स्थानिक फॅक्ट्री शाळेतून मराठी विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास ५१/– रु. चे पारितोषिक दि. १५ ऑगस्ट रोजी महाप्रबंधकांचे हस्ते प्रदान करण्यात आले. गेल्या तीन वर्षांपासून हे बक्षिस देण्यात येत आहे.

शाखेचा तृतीय वर्धापन दिन दिनांक ५ सप्टेंबर १९८८ रोजी स्थानिक म. प. हॉल मध्ये संपन्न झाला. प्रमुख अतिथी समर्थ महाविद्यालय लाखनीचे मराठी विभाग प्रमुख प्रा. प्र. ल. पराड हे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वि. सा. संघ शाखा लाखनीचे सचिव श्री. द. सा. बोरकर हे होते.

प्रारंभी शाखेचे उपाध्यक्ष श्री. माधवराव ब्राम्हणकर यांनी अतिथींचे स्वागत केले. दीप प्रज्वलनाचे कार्यक्रमाला सुरुवात झाली. सचिव हिरामण लांजे उर्फ रमानंद यांनी अतिथींचा परिचय करून दिला व शाखेचा अहवाल वाचून दाखविला. अध्यक्ष मधुकर कनेर यांनी प्रास्ताविक भाषण केले.

आपल्या प्रमुख भाषणात प्रा. प्र. ल. पराड यांनी जीवनात साहित्याचे महत्त्व प्रतिपादन केले.

अध्यक्षीय भाषणात श्री. द. सा. बोरकर यांनी जवाहरनगर शाखेच्या कार्याची प्रसंशा करून श्री. हिरामण लांजे यांच्या धडपडीचा व त्यांनी कवितेच्या प्रांतात केलेल्या प्रगतीचा उल्लेख केला.

कार्यक्रमाचे संचालन श्री. मुकेश लांजेवार यांनी केले. श्री. रुपरेश रोटके यांनी अतिथींचे व व उपस्थितांचे आभार मानले. श्री. चंद्रकांत बोरकर, रामचंद्र नाकाडे, देवाराम महाजन, राजाभाऊ काळबांडे, सुरेश कवडसकर यांनी सहकार्य दिले व कार्यक्रम सफल केला.

यानंतर " सुस्वरम भंडारा तर्फे संगीत रजनी " हा गीतगायनाचा संगीतमय कार्यक्रम झाला. श्री. सुधाकर हांडे व्हायोलीनवर होते. फार मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या रसिकांनी तब्बल तीन तास कार्यक्रमाचा आनंद लुटला.

लाखनी

ता. २५–९–८८ रोजी शाखेची आमसभा पार पडली. अध्यक्षपदी श्री. लोकचंद पटले बिसीं हे होते.

शाखेची नवीन कार्यकारिणी खालील प्रमाणे–

(१) कार्याध्यक्ष– श्री. खु. मो. बारसागडे, (२) कार्योपाध्यक्ष– प्रा. डॉ. यु. गो. पाखमोडे, (३) सचिव– द. सा. बोरकर, (४) सहसचिव– ता. हृ. भुरे, (५) कोषाध्यक्ष– श्री. ना. तु. चवळे, (६) कार्यक्रम प्रमुख– श्री. वि. ग. कांबळे, (७) सदस्यगण– सर्वश्री. द. का. भोयर, र. स. गिऱ्हेपुंजे, दा. शी. शिवनकर, प्रा. वे. तु. आगाशे, सौ. मंदाकिनी पोहरकर, (८) निमंत्रित– श्री. द. गो. अतकारी, प्रा. रि. प. लाखनीकर.

या सभेत एकूण ७ ठराव पारीत करण्यात आले. त्यात एका ठरावान्वये ज्ञानपीठ पारितोषिक प्राप्त झाल्याबद्दल कवी कुसुमाग्रजांचे अभिनंदन करण्यांत आले. दुसऱ्या ठरावान्वये श्री. रमेश

शंकरराव गभणे यांनी आपल्या वडिलांच्या स्मृतिप्रित्यर्थ ५०१/– रुपयाची देणगी शाखेला दिल्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले.

माजी कार्याध्यक्ष श्री. कांबळे नवनियुक्त कार्याध्यक्ष श्री. खु. मो. वारसागडे व सभासद श्री. लोकचंद पटले यांनी आपल्या भावना व्यक्तकेल्या व श्री. द. सा. बोरकर, आणि श्री. ता. ह. भुरे या जोडीच्या परिश्रमाचे कौतुक केले.

कन्हान

बिहार भूकंपग्रस्त सहाय्य निधीकरिता ता. २५–८–८८ ला श्री. धर्मदास भिवगडे, अध्यक्ष वि. सा. संघ, शाखा कन्हान यांचे अध्यक्षतेखाली कार्यकारिणीची सभा घेऊन दि. ४–९–८८ कन्हानच्या मुख्य रस्त्यावर प्रभातफेरीने फिरत बिहार भूकंपग्रस्त सहाय्य निधी जमा करण्यात आला त्या प्रमाणे एकूण निधी रु. ७५१/– जमा करण्यांत आले. रु. ७५१/– चा बँक ड्राफ्ट लोकमत कार्यालयात जमा करण्यात आला. हा निधी जमा करण्यात श्री. प्रभाकर धोटे, स्टेशन ऑफिसर पोलीस स्टेशन कन्हान यांनी विशेष मार्गदर्शन केले. मदत फेरी यशस्वी करण्यात श्री. धर्मदास भिवगडे, शाखाध्यक्ष श्री. रामराव पाटील, उपाध्यक्ष, श्री. तेजराव गजभिये, सचिव श्री. श्याम मेश्राम, श्री. आनंद गजभिये, श्री. विनोद सोमदेवे, श्री. सुरेश बोरकर, श्री. अब्दुल रज्जाक, श्री. राजु त्रिपाठी, श्री. देवचंद नवाईतुल, श्री. सखाराम मंडपे, श्री. घनश्याम भेलावे आणि ॲड. भिवगडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

सरचिटणीस

(मलपृष्ठ २ वरून)

८. उमेदवारी परत घेतल्या न गेलेल्या व ज्यांची उमेदवारी वैध आहे अशा उमेदवारांची यादी गुरुवार दिनांक ९–२–१९८९ ला रात्री ९ वाजताचे सुमारास सूचना फलकावर लावण्यात येईल.

९. मतदारांना केंद्रीय कार्यालयातून सोमवार दि. २०–२–१९८९ रोजी मतपत्रिका पाठविण्यात येतील.

१०. सभासदांकडून मतपत्रिका केंद्रीय कार्यालयाकडे शुक्रवार दिनांक १०–३–१९८९ ला सायंकाळी ८ वाजेपर्यंत पोचणे आवश्यक आहे.

११. मतपत्रिका–मोजणी रविवार दिनांक १२–३–१९८९ ला सकाळी ९ वाजेपासून केंद्रीय कार्यालयात सुरू होईल.

१२. निवडणुकीचा निकाल रविवार दि. १२–३–१९८९ ला विदर्भ साहित्य संघ केंद्रीय कार्यालयात मतमोजणी संपल्यावर लगेच घोषित करण्यात येईल.

१३. (अ) घटना कलम १२ (ड) प्रमाणे एकूण निवडणूक प्रक्रियेविषयी तक्रार नोंदविण्याची अंतिम तारीख व वेळ सोमवार दिनांक २०–३–१९८९ सायंकाळी ७ वाजेपर्यंत ही राहील. (ब) लवादाकडून तत्संबंधी निकाल देण्याची अंतिम तारीख गुरुवार दिनांक ३०–३–१९८९ सायंकाळी ७ वाजता ही राहील.

टीप : १. नामनिर्देशनपत्र विदर्भ साहित्य संघाच्या केंद्रीय कार्यालयात रोख रु. ५/– (रुपये पाच फक्त) भरून दिनांक ६–१–१९८९ पासून सायंकाळी ६–३० ते ८–३० या कार्यालयीन वेळात प्राप्त होतील. नामनिर्देशन पत्रिकेच्या शेवटी दिलेल्या टीपेतील सूचना बंधनकारक राहतील.

२. घटना कलम १२ (अ:) प्रमाणे अध्यक्षपदासाठी रु. १००/–(रु. शंभर फक्त) व कार्यकारिणी सदस्यापदासाठी रु. ५०/–(रुपये पन्नास फक्त) प्रत्येक उमेदवारास रोख स्वरूपात किंवा बँक ड्राफ्टच्या स्वरूपात अनामत रक्कम म्हणून कार्यालयात जमा करावी लागेल. बँक ड्राफ्ट साहित्य संघाच्या नावे काढलेला असावा.

३. निवडणुकीसंबंधीचा सर्व पत्रव्यवहार "निर्वाचनाधिकारी, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, सीताबर्डी नागपूर, ४४० ०१२" ह्या पत्त्यावर करावा. अन्य पत्त्यावर केलेल्या पत्रव्यवहाराची जबाबदारी स्वीकारण्यात येणार नाही.

रामकुमार श्रीवास्तव
निर्वाचन अधिकारी,
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

नागपूर
दिनांक ३१ डिसेंबर १९८८

अनुक्रमणिका

प्रकाशक : मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर – ४४००१२.
मुद्रक : मधूसूदन पांडुरंग बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धंतोली, नागपूर – ४४० ०१२.
मुखपृष्ठ मुद्रक : मधुकर आर्टस्, धंतोली, नागपूर – ४४० ०१२.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका